# न्यायनिर्णय आणि लिंगविषयक दृष्टिकोन

## (न्यायनिर्णय लिहिताना संवेदनशीलता व सहानुभूती)

# न्यायनिर्णय आणि लिंगविषयक दृष्टिकोन

## (न्यायनिर्णय लिहिताना संवेदनशीलता व सहानुभूती)

## अनुक्रमणिका


- संदर्भ ४
- भारतातील लिंगविषयक न्यायशास्त्र १४
- पीडितेला दोष देण्याविरुद्ध कायदेशीर संरक्षण २४
- उलट-तपासणी आणि लैंगिक इतिहास २५
- न्यायालयीन संवेदनशीलतेतील विरोधाभास : पुरोगामी दृष्टिकोन आणि कायमस्वरूपी पूर्वग्रह २७
- रूढी करण/ ठोकळेबाजी विरुद्धचा नियम : लिंग न्याय्य समाजाकडे संक्रमण ३२
- न्यायनिर्णयांमधील लिंगाधारित /रूढीवादी भाषा आणि त्यास पर्यायी शब्द ३४
- संवेदनशील आणि सहानुभूतिपूर्ण न्यायालयीन कार्यपद्धती ४३
- विचारार्थ मुद्दे ४८


## जोडपत्रे


- न्यायालयीन कामकाजशी संबंधित अभिप्राय प्रश्नांचा अहवाल I
- लैंगिक अत्याचारांतील व अन्य गुन्ह्यातील बचावलेल्या/ पीडित महिलांसाठी नुकसानभरपाई योजना - २०१८ II

# संदर्भ

आपल्या संस्कृतीत लिखित भाषांचा समावेश झाल्यापासून, तिने समाजातील मोठ्या वर्गापर्यंत आपले विचार लिखित स्वरूपात व्यक्त करण्यासाठी मदत केली आहे. परंतु, समाजातील विशेषाधिकार प्राप्त झालेल्या वर्गाने स्वतःचे उच्च स्थान टिकवून ठेवण्यासाठी या भाषेला स्वतःच्या सक्षमीकरणाचे साधन आणि इतरांचा अवमान करण्याचे शस्त्रही बनवले. १४९२ मध्ये मुद्रण यंत्राचा (प्रिंटिंग प्रेस) शोध लागल्यानंतर भाषेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आणि डिजिटलायझेशनमुळे तिची पोहोच आणि तिची ताकद खूप मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. या घडामोडींमुळे मानवी विचार दूरवर पसरू लागले. संवाद साधण्याच्या आधुनिक माध्यमांद्वारे  सामाजिक रचनेतील खोलवर रुजलेले पूर्वग्रह देखील थेट किंवा अप्रत्यक्षपणे दूरवर पोहोचले आहेत. जगातील सर्वच समाजांमध्ये लिंग (जेंडर) हा भेदभाव आणि अवहेलना यांचा एक मूलभूत स्रोत आहे. परंतु, जिथे जिथे भेदभाव असतो, तिथे प्रतिकार करणे ही नैसर्गिक मानवी प्रतिक्रिया असते; आणि अशाच प्रतिकाराने अनेक सुधारणा चळवळींना जन्म दिला आहे, ज्याची साक्ष इतिहास देतो. या प्रतिकाराच्या प्रक्रियेत कायदेशीर यंत्रणा अनेकदा महत्त्वाची भूमिका बजावतात. न्यायाधीशांनी  या समस्येकडे लक्ष वेधताना विविध प्रकारे भाष्य केले आहे आणि लिंग-संबंधित वादांमध्ये वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट शब्द किंवा अभिव्यक्ती यावरून समाजाची एकूण मानसिकता समजून घेण्यास मदत झाली आहे.

गेल्या शतकातील ५० आणि ६० च्या दशकात जगभरातील न्यायालयांमध्ये लिंगभाव-विषयक वादांसोबतच जात, रंग आणि वर्ग-संबंधित वादांचे वर्चस्व दिसून आले. वास्तविक, १९ व्या शतकापासूनच लिंगभावाचा मुद्दा राजकीय विचारवंत आणि समाजसुधारकांना आकर्षित करत होता, परंतु तो प्रामुख्याने पुरुष आणि स्त्री या दुहेरी (द्विध्रुवीय) (बायनरी) वादा पुरता मर्यादित होता. मात्र, २० व्या शतकाच्या मध्यापासून लैंगिक चर्चेने या द्विध्रुवीयतेच्या पलीकडे जाऊन खुल्या मंचांवर

स्थान मिळवले. कामाच्या ठिकाणी म्हणजेच कार्यालयांमधून स्त्रियांच्या वाढत्या उपस्थितीमुळे शोषणाचे विविध प्रकार समोर आले, ज्यांचा सामना करण्यासाठी न्यायालयांना हस्तक्षेप करावा लागला. मुख्यत्वे न्यायालयांच्या माध्यमातूनच सहानुभूती आणि हक्कांवर आधारित दृष्टिकोन यांचा मेळ घालणारे एक नवीन न्यायशास्त्र (जुरिस्प्रूडेंस) उदयास आले. विशाखा, नर्गिश मिर्झा, गीथा हरिहरन आणि नाझ फाउंडेशन यांसारखे आपल्या सर्वोच्च न्यायालयाचे काही महत्त्वाचे निर्णय हे नवीन न्यायशास्त्राचा आपल्या कायदेशीर व्यवस्थेत झालेला समावेश दर्शवतात.

लिंगभाव-विषयक कायदेशास्त्र विकसित होत असताना सुरुवातीला ज्या एका आव्हानाची कल्पना केली गेली नव्हती, ते म्हणजे तक्रारदाराची पीडिता म्हणून असलेली भूमिका. लैंगिक विषयाशी संबंधित प्रकरणांमध्ये संवेदनशीलता आणि सहानुभूतीपूर्वक न्यायिक दृष्टिकोनाची गरज होती. विशेषतः लैंगिक अपराधांच्या आरोपांशी संबंधित खटल्यांमध्ये, खुल्या न्यायालयात चौकशी दरम्यान गुन्ह्याचे घडलेले प्रसंग जसेच्या तसे मांडल्याने पीडितेला तो प्रसंग पुन्हा तिच्यावर ओढावल्या सारखा वाटून ती मानसिकदृष्ट्या दुःखी कष्टी होत असे. दुर्दैवाने, लैंगिक अत्याचाराकडे अजूनही एका वेगळ्या श्रेणीमधील गुन्हा म्हणून विचित्र प्रकारच्या दृष्टीने  पाहिले जाते आणि अनेक प्रकरणांमध्ये पीडिता सुद्धा याला कुठेतरी कारणीभूत किंवा दोषी आहे, हा सुप्त पूर्वग्रह अद्यापही कायम आहे. याच कारणामुळे, न्याय चौकशी दरम्यान बचाव पक्षाचे वकील अनेकदा गुन्ह्याच्या वेळी पीडितेने केलेला पोशाख, तिचे एकूण दिसणे, तसेच ती वेळ आणि ते ठिकाण या गोष्टींवर अधिक भर देण्याचा प्रयत्न करतात.

अशा स्वरूपाच्या गुन्ह्यातील पीडित महिला ही उलटतपासणीला सामोरे जाण्याच्या भीतीमुळे अनेकदा तक्रार दाखल करण्यास धजावत नाही. त्यातच, न्यायनिर्णया मध्ये  करण्यात येणारे गुन्ह्याचे  सविस्तर व चित्तवेधक वर्णन पीडितेच्या मानसिक त्रासात भर घालते. याच ठिकाणी लिंग-संबंधित गुन्ह्यांमध्ये गुन्हेगारी न्यायव्यवस्थेतील सहानुभूती अत्यंत आवश्यक ठरते. समाजशास्त्रज्ञांच्या मते,

सहानुभूतीची क्षमता हा मनुष्याच्या अंगभूत गुणधर्मांपैकी एक आहे; तथापि, जागरूकता आणि सराव यांच्या माध्यमातून ती अधिक विकसित करता येते. सर्व स्तरांवर आणि सर्व श्रेणी मधील न्यायाधीशांमध्ये संवेदनशीलता व सहानुभूती रुजवण्यासाठी, त्यांना मूलभूत कायद्यांचे प्रशिक्षण देण्यासोबतच संवाद व व्यवहार कौशल्य याचे प्रशिक्षण देणेही आवश्यक आहे. न्यायालयीन कामकाज पार पाडताना बुद्धिगुणासोबत भावनिक बुद्धिमत्तेची जोड देणे आवश्यक आहे.

सुमोटो रिट याचिका (क्रिमिनल) क्र. १/२०२५ मध्ये, भारताचे माननीय सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील आणि न्यायमूर्ती जोयमाल्या बागची व न्यायमूर्ती एन. वि. अंजारिया यांच्या खंडपीठाने एका उच्च न्यायालयाच्या आदेशावर स्वतःहुन कारवाई सुरू केली होती. या प्रकरणात भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३७६ आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा २०१२ (पोक्सो) च्या कलम १८ अंतर्गत गुन्ह्यांचे आरोप समाविष्ट होते. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशात गुन्ह्याच्या कृत्याचे काही विस्तृत (ग्राफिक) वर्णन देण्यात आले होते. उच्च न्यायालयाने समन्स आदेशात सुधारणा करून, आरोपांमध्ये बदल केला आणि भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम ३५४-ब तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ मधील कलम ९ व १० अंतर्गत तुलनेने कमी गंभीर स्वरूपाचे गुन्हे नमूद केले. माननीय सर्वोच्च न्यायालयाचा हा न्यायनिर्णय १० फेब्रुवारी २०२६ रोजी देण्यात आला.

उच्च न्यायालयाच्या आदेशाचा गुणवत्तेच्या आधारावर विचार केल्यानंतर, मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निर्देश दिले:

*"१७. विद्वान वरिष्ठ वकील, श्रीमती गुप्ता आणि श्री. फूलका यांनी आक्षेपित न्यायनिर्णयातील कायदेशीर त्रुटींकडे लक्ष वेधण्याव्यतिरिक्त, लैंगिक गुन्ह्यांची बळी ठरल्याचा आरोप असलेल्या अल्पवयीन मुलीच्या दुर्दशेबाबत आक्षेपित न्यायनिर्णयातून दिसून आलेल्या संवेदनशीलतेच्या अभावाची (उदासीनतेची) दखल घेण्याची विनंतीही*

*या न्यायालयाला केली आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, न्यायव्यवस्थेच्या विविध स्तरांवर असे अनेक प्रसंग निदर्शनास आले आहेत की, लैंगिक अपराधांशी संबंधित प्रकरणे हाताळताना, विशेषतः असुरक्षित आणि/किंवा अल्पवयीन पीडिता व साक्षीदारांच्या बाबतीत, न्यायाधीश आणि न्यायिक अधिकाऱ्यांकडून करुणा व सहानुभूतीचा योग्य प्रकारे अवलंब करण्यात आलेला नाही आणि त्याऐवजी असंवेदनशील न्यायिक निर्णय देण्यात आलेले आहेत. या अनुषंगाने, भविष्यात अशा समस्या निर्माण होऊ नयेत म्हणून या न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वे ठरवून द्यावीत, अशी विनंती विद्वान वरिष्ठ वकील/पक्षकारांच्या वकिलांनी केली आहे."*

*१८. आमच्यासमोर मांडण्यात आलेल्या मुद्द्यांमध्ये काही प्रमाणात तथ्य असल्याचे आम्हाला आढळून येते. आपली न्यायव्यवस्था ही एकसंध संरचना म्हणून जे नागरिक त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी येतात त्यांना न्याय आणि समाधान देण्यासाठी बनवली गेली आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी, आमचे प्रयत्न हे केवळ संविधानिक आणि कायदेशीर तत्त्वांच्या योग्य अंमलबजावणीवर आधारित असणे पुरेसे नाही, तर त्यासोबतच करुणा आणि सहानुभूतीचे वातावरण निर्माण करणारे सुद्धा असले पाहिजेत. यापैकी कोणत्याही एका मूलभूत बाबीचा अभाव असल्यास, न्यायिक संस्थांना त्यांची महत्त्वपूर्ण कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडणे शक्य होणार नाही.*

*१९. एखाद्या पक्षकाराच्या वास्तविक परिस्थितीचा तसेच न्यायालयासमोर दाद मागण्यासाठी येताना त्याला सामोरे जावे लागू शकणाऱ्या असुरक्षिततेचा विचार न करणाऱ्या कोणत्याही न्यायाधीशाकडून किंवा कोणत्याही न्यायालयाच्या न्यायनिर्णयामधून संपूर्ण न्याय केला जाण्याची अपेक्षा करता येणार नाही. कायदेशीर प्रक्रियेचा एक भाग म्हणून आमच्या निर्णयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना ज्या प्रक्रियेला सामोरे जावे लागेल ती प्रक्रिया निश्चित करण्यापासून ते कोणत्याही प्रकरणात दिलेल्या अंतिम न्याय निर्णयापर्यंत,कारुण्य, मानवता आणि समजूतदारपणा यांचे मूल्य प्रतिबिंबित झाले पाहिजे, जे एका निष्पक्ष आणि प्रभावी न्यायव्यवस्थेच्या निर्मितीसाठी*

*अत्यंत आवश्यक आहेत.*

*२०. न्यायव्यवस्थेतील सदस्यांच्या दृष्टिकोनामध्ये तसेच त्यासोबतच्या न्यायालयीन प्रक्रियांमध्ये अंतर्निहित संवेदनशीलता आणि विवेकबुद्धी रुजविण्यासाठी व जोपासण्यासाठी काही कारवाई करणे आवश्यक आहे, याबाबत कोणतीही शंका नाही. या दिशेने, या देशातील संविधानिक न्यायालयांनी वेळोवेळी न्यायिक तसेच प्रशासकीय स्तरावर विविध पावले उचलली आहेत. तथापि, आतापर्यंत करण्यात आलेल्या प्रयत्नांमधून अपेक्षित परिणाम साध्य झालेला दिसून येत नाही.*

*२१. असे असताना, यापूर्वी विविध घटनात्मक व वैधानिक संस्थांनी अशा स्वरूपाचे जे प्रयत्न केले आहेत, त्या प्रयत्नांचे प्रत्यक्ष परिणाम तसेच अशाच प्रकारच्या संवेदनशील प्रकरणांमध्ये पीडिता आणि तक्रारदारांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या व्याप्तीची सर्वसमावेशक माहिती घेतल्याशिवाय, तसेच कोणतेही मार्गदर्शन उपलब्ध नसताना, या टप्प्यावर नव्याने कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याचा प्रयत्न करण्यास आम्ही साशंक आहोत. तसेच, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची मौल्यवान मते व सूचना विचारात घेतल्याशिवाय अशा प्रकारचा प्रयत्न करण्यात येऊ नये; कारण आमच्या न्यायालयीन अनुभवाच्या आधारे, अशा तज्ज्ञांची मते व सूचना केवळ न्यायालयीन कार्यवाहीतून आपोआप समोर येत नाहीत.*

*२२. यासाठी, आम्ही नॅशनल ज्युडिशिअल अकॅडमी (राष्ट्रीय न्यायिक अकादमी), भोपाळ यांचे तर्फे त्यांचे संचालक, न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस व या न्यायालयाचे माजी न्यायाधीश यांना एका तज्ज्ञ समितीची स्थापना करण्याची विनंती करत आहोत. या तज्ज्ञ समितीचे अध्यक्षपद न्यायमूर्ती बोस भूषवतील आणि यामध्ये इतर चार क्षेत्रतज्ज्ञांचा सदस्य म्हणून समावेश असेल, ज्यामध्ये कायदे व्यावसायिक, शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश केला जाऊ शकतो.*

*२३. 'लैंगिक अपराध आणि इतर संवेदनशील प्रकरणांच्या संदर्भात न्यायाधीश*

*व न्यायिक प्रक्रियांमध्ये संवेदनशीलता आणि करुणाभाव रुजविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे' या विषयावर सर्वंकष अहवाल तयार करण्याची विनंती आम्ही तज्ज्ञ समितीस करीत आहोत. अशी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी यापूर्वी न्यायिक स्तरावर किंवा प्रशासकीय स्तरावर करण्यात आलेल्या उपाययोजनांचा तसेच त्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे प्रत्यक्ष परिस्थितीत दिसून आलेल्या विविध परिणामांचा समितीने विचार करावा. तसेच, यापूर्वी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आणि संपूर्ण न्यायव्यवस्थेतील विविध हित धारकांना प्रत्यक्षात आलेल्या विविध अनुभवांचा विचार करून सर्वंकष शिफारसी तयार कराव्यात. या शिफारशी ह्या 'न्यायाधीश आणि न्यायव्यवस्थेने 'लैंगिक अपराध तसेच असुरक्षित पीडिता, तक्रारदार आणि/किंवा साक्षीदार यांचा समावेश असलेल्या तत्सम संवेदनशील घटनांशी संबंधित प्रकरणे हाताळताना अवलंबावयाच्या दृष्टिकोनासंबंधी प्रारूप मार्गदर्शक तत्त्वे, या स्वरूपात असाव्यात.*

*२४. अहवाल तयार करताना समितीने आपल्या देशातील भाषिक विविधता लक्षात घ्यावी. आपल्या दंडात्मक कायद्यांनुसार ज्यांचा वापर सामान्यतः अपराध ठरेल, अशा आक्षेपार्ह शब्दांचे व अभिव्यक्तींचे विविध प्रकार आढळून येतात; तथापि, स्थानिक बोलीभाषांमध्ये अशा शब्दांचा व अभिव्यक्तींचा समाजातील सदस्यांकडून उघडपणे वापर केला जातो. अशा शब्दांचे अथवा अभिव्यक्तींचे आक्षेपार्ह स्वरूप स्पष्टपणे समजलेले नसल्यामुळेच त्यांचा वापर केला जात असल्याचे दिसून येते. समितीने आपल्या अहवालाचा एक भाग म्हणून विविध भाषांमधील असे शब्द/अभिव्यक्ती ओळखून त्यांचे संकलन केल्यास त्याचे स्वागतच केले जाईल, जेणेकरून ते दुर्लक्षित राहणार नाहीत आणि तक्रारदार/पीडितांना त्यांनी सहन केलेल्या वेदनेचे/आघाताचे अधिक चांगले व संपूर्ण स्वरूपात कथन करता येण्यासाठी सक्षम करता येईल.*

*२५. असे करताना तज्ज्ञ समितीने हे लक्षात ठेवले पाहिजे की, या मार्गदर्शक तत्त्वांचे प्राथमिक लाभार्थी हे पीडिता/तक्रारदार आहेत आणि त्यांपैकी बहुसंख्य व्यक्ती*

*या बालके, कोवळ्या वयाच्या महिला तसेच समाजातील असुरक्षित घटकांतील सदस्य आहेत. त्यामुळे, समितीने याची खात्री करावी की ही मसुदा मार्गदर्शक तत्त्वे अशा प्रकारे तयार केली जावीत, जेणेकरून कोणत्याही पार्श्वभूमीच्या किंवा परिस्थितीच्या व्यक्तीला ती सहज समजतील आणि वापरता येतील.*

*२६. यासाठी, अशी आमची शिफारस आहे की, तज्ज्ञ समितीने शक्यतो संपूर्ण अहवाल आणि कोणत्याही परिस्थितीत, किमान प्रारूप मार्गदर्शक तत्त्वे तरी, सर्वसामान्य व्यक्तीं ज्यांच्या हिताचे संरक्षण करण्याचा या मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश आहे, त्यांना ती सहज समजतील अशा सोप्या भाषेत तयार करावीत. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये परकीय भाषा आणि परकीय अधिकारीतेमधून आलेल्या जड व क्लिष्ट संज्ञा नसाव्यात, अशी आमची अपेक्षा आहे. भारतीय न्यायिक प्रक्रियेशी संबंधित हित धारकांच्या प्रत्यक्ष व दैनंदिन अनुभवांच्या संदर्भात त्यांचे स्वरूप निश्चित केलेले असावे आणि त्यामध्ये आपल्या देशाची मूल्यव्यवस्था, नीतिमूल्ये आणि सामाजिक संरचना यांचा थेट संदर्भ असावा.*

*२७. सर्वसामान्य जनतेसाठी असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमधील काही भागांच्या भाषांतरित आवृत्त्या तयार करण्याचाही समिती विचार करू शकते. भाषिक आणि कायदेशीर कार्यनिपुणतेचा विचार न करता, सर्व वाचकांना विविध संकल्पना पूर्णपणे स्पष्टपणे समजाव्यात हा यामागचा मुख्य उद्देश आहे.*

*२८. तसेच, आम्ही हे सुद्धा स्पष्ट करू इच्छितो की, प्रारूप मार्गदर्शक तत्त्वांच्या विस्ताराच्या बाबतीत आम्ही तज्ज्ञ समितीवर कोणत्याही प्रकारचे बंधन घालण्याचा प्रयत्न करीत नाही. विविध संकल्पना, अधिकार, कार्यपद्धती आणि अनुसरण्यात येणाऱ्या उत्तम पद्धती यांचे स्पष्टीकरण व विशदीकरण करण्याचा प्रयत्न केला जात असताना, समितीने याची खात्री करावी की, अहवाल हा सर्वसमावेशक व सविस्तर असावा आणि त्यात आवश्यक त्या ठिकाणी योग्य व पुरेशी स्पष्टीकरणे तसेच उदाहरणे समाविष्ट करण्यात*

*यावीत.*

*२९. तज्ज्ञ समितीला आवश्यक वाटल्यास, या विषयासंदर्भात भाषाशास्त्राचे अभ्यासक, सरकारी अभियोक्ता, वकील, सामाजिक शास्त्रज्ञ तसेच समुपदेशक यांसारख्या अन्य तज्ज्ञांची मदत घेण्याचे स्वातंत्र्य राहील.*

*३०. सदर आदेशाची एक प्रत मा. न्यायमूर्ती बोस यांच्याकडे पाठविण्याचे निर्देश या न्यायालय प्रशासनाला देण्यात येत आहेत आणि त्यांनी शक्यतो दोन आठवड्यांच्या कालावधीत तज्ज्ञ समिती गठित करावी, अशी आम्ही विनंती करीत आहोत. पक्षकारांचे वकील हे समिती साठी उपयुक्त ठरू शकतील अशी लेखी निवेदने, तक्ते, याद्या तसेच इतर दस्तऐवज या न्यायालय प्रशासनाकडे दोन आठवड्यांच्या आत दाखल करू शकतील. त्यानंतर, हे दस्तऐवज तसेच या सर्व प्रकरणांच्या कागदपत्रांच्या संचाची संपूर्ण प्रत समितीच्या विचारार्थ समितीकडे पाठविण्यात यावी.*

*३१. तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी दिलेल्या त्यांच्या मौल्यवान वेळेबद्दल व केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांना मा. न्यायमूर्ती बोस जेवढे मानधन निश्चित करतील तेवढे मानधन अदा करण्यात यावे आणि त्यासाठी आवश्यक निधी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.*

*३२. आम्ही अशी विनंती करीत आहोत की, तज्ज्ञ समितीने आपले विचारविनिमय पूर्ण करून शक्यतो तीन महिन्यांच्या कालावधीत या न्यायालयास अहवाल सादर करावा.*

*३३. वरीलप्रमाणे निर्देश पारित केल्यानंतर, आमचे असे सुविचारित मत आहे की, दिनांक १७.०३.२०२५ रोजीचा आदेश जो आम्ही यापूर्वीच रद्द केला आहे, त्या आदेशासंदर्भातील सु मोटो रिट याचिका ही पुढे प्रलंबित ठेवण्याची आवश्यकता नाही. तज्ज्ञ समिती जेव्हा आणि जसा आपला अहवाल या न्यायालयास सादर करेल, तेव्हा त्या अहवालाचा विचार सर्वंकष स्वरूपात करण्यात येईल आणि तो केवळ एकाच*

*प्रकरणाच्या संदर्भापुरता मर्यादित राहणार नाही. त्या अनुषंगाने, तज्ज्ञ समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर, योग्य त्या निर्देशांसाठी तो प्रशासकीय स्तरावर मा. भारताचे मुख्य न्यायमूर्ती यांच्यासमोर ठेवण्याचे निर्देश प्रशासनास देण्यात येत आहेत.*

*३४. म्हणून, वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने, सदर सुमोटो प्रकरण निकाली काढण्यात येत आहे. प्रलंबित अंतरिम अर्ज, काही असल्यास, ते देखील निकाली काढण्यात येत आहेत."*

सदर प्रकाशन हे भारताच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या अनुषंगाने प्रकाशित करण्यात आले आहे. खाली सही करणार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीमध्ये मा. न्यायमूर्ती श्रीमती सोनिया जी. गोकानी, गुजरात उच्च न्यायालयाच्या माजी मुख्य न्यायमूर्ती, श्रीमती अनुराधा शंकर, मध्य प्रदेशच्या माजी पोलीस महासंचालक, डॉ. सुरत सिंह, वकील, भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि प्रा. ल्युसी टी. व्ही. झेहोल, प्राध्यापक, मानववंशशास्त्र विभाग, नॉर्थ-ईस्टर्न हिल युनिव्हर्सिटी, शिलाँग, यांचा समावेश होता. सदर काम पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय न्यायिक अकादमीच्या अध्यापक सदस्या डॉ. सोनम जैन यांनी समितीस सहाय्य केले. मध्य प्रदेश संवर्गातील जिल्हा न्यायाधीश, सध्या अकादमीमध्ये विशेष कामगिरीसाठी नेमलेले अधिकारी श्री. श्रीश कैलाश शुकुल यांनीही समितीस आवश्यक त्या सूचना आणि माहिती तसेच प्रशासकीय स्तरावर सहाय्य प्रदान केले.

फौजदारी न्यायव्यवस्थेतील विविध हित धारकांकडून न्यायालयीन भाषेबाबत त्यांना असलेल्या आकलनासंदर्भात अभिप्राय प्राप्त करण्याच्या मुख्य उद्देशाने आम्ही सर्व राज्य न्यायिक अकादमींकडे एक प्रश्नावलीही पाठविली होती. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांमार्फत न्यायिक अधिकारी, साक्षीदार आणि पीडिता यांसारख्या हितधारकांशी संपर्क साधण्यात आला होता. प्राप्त झालेले एकत्रित उत्तर या प्रकाशनास जोडपत्र - I म्हणून जोडण्यात आले आहे.

या स्वरूपाचे कार्य हाती घेणे हे समितीसमोरील एक अनोखे काम होते. समितीने लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित विषयांबाबतच्या न्यायनिर्णयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या लेखनशैलीचे स्वरूप टिपण्याचा आणि त्या अधोरेखित करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला आहे. तथापि, अशा स्वरूपाचे प्रकाशन कायमस्वरूपी मार्गदर्शक तत्त्व म्हणून कार्य करू शकत नाही, कारण भाषा ही सातत्याने विकसित होत असते. रस्त्यावर बोलले जाणारे शब्द थेट न्यायनिर्णयांमध्ये वापरले जाऊ शकत नाहीत. लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये न्यायनिर्णय हे सहानुभूती आणि संवेदनशीलतेच्या आधारावर असले पाहिजेत तसेच, कायदेशीर क्षेत्रातील सर्व घटकांनी एकत्रितपणे अशी एक भाषिक परिसंस्था तयार करणे आवश्यक आहे, जी आक्षेपार्ह किंवा अयोग्य शब्द आणि विशिष्ट कृत्यांचे वर्णन करण्याच्या अयोग्य पद्धतींना दूर करेल. न्यायाधीश आणि वकिलांनी न्यायालयीन कामकाजात संयमित शब्दप्रयोगांचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून पीडितांना न्यायालयात  सुरक्षित वाटेल आणि पुन्हा मानसिक आघात होण्याची भीती त्यांच्या मनात निर्माण होणार नाही. योग्य शब्दप्रयोगांचा वापर केल्यास समाजात खोलवर रुजलेल्या लिंगाधारित  पूर्वग्रह मुळापासून नष्ट होण्यास मदत होऊ शकते.

ही संधी दिल्याबद्दल सदर समिती ही मा. सर्वोच्च न्यायालयाची ऋणी आहे. समितीच्या सदस्यांच्या मते, हा उपक्रम इतर क्षेत्रांतील विचारवंत व्यक्तींनाही आपापल्या क्षेत्रांत लिंग-तटस्थता आणि संवेदनशीलता आणण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित करेल. तसेच, या प्रकाशनासाठी सहकार्य केल्याबद्दल समिती सर्व राज्य न्यायिक अकादमींचेही आभार मानते.

**न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस**

# भारतातील लिंगविषयक न्यायशास्त्र

सातत्याने चालणाऱ्या न्यायिक प्रक्रियेद्वारे, हा मुद्दा हाताळताना भारतातील न्यायव्यवस्थेने लिंगभावावर आधारित न्यायाची व्याप्ती सातत्याने विस्तारली आहे. लिंगविषयक न्यायाची व्याप्ती सातत्याने विस्तारित केली आहे. न्यायालयीन निर्णयांमधून विकसित झालेले न्यायशास्त्र व्यक्तीची प्रतिष्ठा, शारीरिक अखंडता, समानता आणि गोपनीयता यांच्या संरक्षणावर भर देत असल्याचे दिसून येते. न्यायालये ही पितृसत्ताक पूर्वग्रह मोडून काढण्यात, विविध घटकांमुळे निर्माण होणाऱ्या परस्परव्यापी संवेदनशीलतेची ओळख पटवण्यात आणि वर्चस्ववादी लैंगिक छळापासून कामाच्या ठिकाणी व संस्थात्मक पातळीवर सुरक्षा कवच मजबूत करण्यात परिवर्तनात्मक भूमिका बजावत आहेत. यामुळेच प्रजनन आणि लैंगिक स्वायत्तता याची ओळख पटली असून महिला, बालके, तृतीयपंथी व्यक्ती आणि क्वीअर/नॉन-बायनरी समुदायांच्या हक्कांना लिंग-तटस्थ पद्धतीने दुजोरा मिळाला आहे. गेल्या अनेक वर्षांतील विविध न्यायनिर्णयांमधून अधिक समावेशक समाजाची उभारणी करण्याच्या दिशेने न्यायव्यवस्थेची सातत्यपूर्ण बांधिलकी सामूहिकरीत्या प्रतिबिंबित होते.

| अ. क्र. | प्रकरणाचे नाव आणि वर्ष | तथ्यांचा संक्षिप्त गोषवारा | भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयातील लिंग-विषयक विधीतत्त्वमीमांसेचे संक्रमण दर्शविणारी तत्वे. |
|---|---|---|---|
| १ | युसुफ अब्दुल अजीझ विरुद्ध बॉम्बे राज्य (ए. आय. आर. १९५४ एस. सी. ३२१) | लिंगाधारित भेदभावाच्या कारणास्तव भारतीय दंड संहितेच्या कलम ४९७ (व्यभिचारविषयक अधिनियम) यास आव्हान देण्यात आले. (या तक्त्यातील अनुक्रमांक १३ वर नमूद केलेल्या 'जोसेफ शाइन' या प्रकरणात भारतीय दंड संहितेतील कलम ४९७ नंतर रद्द करण्यात आले आहे.) | माननीय सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद १५(३) मध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या महिलांसाठीच्या विशेष तरतुदींची घटनात्मक वैधता कायम ठेवली आणि वास्तविक समानता आणण्यासाठी महिलांच्या बाजूने संरक्षणात्मक उपाय उपलब्ध असणे गरजेचे आहे यास मान्यता दिली. |
| २. | सी. बी. मुथम्मा विरुद्ध भारतीय संघराज्य ((१९७९) ४ एस. सी. सी. २६०) | भारतीय परराष्ट्र सेवेतील पहिल्या महिलेने भेदभाव निर्माण करणाऱ्या पदोन्नती आणि सेवा नियमांना आव्हान दिले. | न्यायालयाने लिंगाधारित सेवाविषयक नियमांचे खंडन केले आणि सार्वजनिक रोजगारातील समानतेचा पुनरुच्चार केला; तसेच, कामाच्या ठिकाणी विवाहित महिलांना विवाहित पुरुषांच्या तुलनेत दुय्यम किंवा प्रतिकूल वागणूक देता येणार नाही, असे स्पष्ट केले. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | तुकाराम विरुद्ध महाराष्ट्र राज्य ((१९७९) २ एस. सी. सी. १४३) | पोलिस कोठडीत अल्पवयीन मुलीवर बलात्कार; संमतीबाबतच्या संकुचित दृष्टिकोनामुळे आरोपीची झालेली निर्दोष मुक्तता. | जनक्षोभामुळे बलात्कार अधिनियमात व्यापक सुधारणा झाल्या; यामध्ये पीडिता केंद्रित दृष्टिकोनाला प्राधान्य देणारा अर्थ लावण्यावर आणि संमती व पुराव्यांबाबतच्या कायदेशीर बदलांवर भर देण्यात आला. |
| ४. | एअर इंडिया विरुद्ध नेर्गेश मिर्झा ((१९८१) ४ एस. सी. सी ३३५) | हवाई सुंदरीं(एअर होस्टेस ) यांनी विवाह किंवा गर्भधारणेमुळे सक्तीने निवृत्त होण्यास भाग पडणाऱ्या नियमांना  आव्हान दिले. | न्यायालयाने असे अधिनिर्णित केले की, गर्भधारणेवर आधारित सेवा-समाप्तीचे असे नियम हे मनमानी आणि असंवैधानिक स्वरूपाचे असून अशा तरतुदींना स्त्रीत्वाचा अपमान म्हटले गेले पाहिजे. |
| ५. | भरवाडा भोगीनभाई हिरजीभाई विरुद्ध गुजरात राज्य ((१९८३) ३ एस. सी. सी. २१७) | बलात्काराच्या गुन्ह्यात बचावलेल्या महिलेच्या साक्षीत पुष्टी देणाऱ्या इतर पुराव्यांचा अभाव असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. | न्यायालयाने असे अधिनिर्णित केले की, लैंगिक हिंसाचाराची तक्रार करण्याबाबतचा सामाजिक कलंक लक्षात घेता बलात्काराच्या गुन्ह्यात बचावलेल्या महिलेच्या साक्षिला पुष्टी देण्या करिता  इतर पुरावे देण्याची आवश्यकता नाही. |
| ६. | पंजाब राज्य विरुद्ध गुरमित सिंग ((१९९६) | न्यायचौकशी दरम्यान बलात्कार पीडितेची गोपनीयता आणि प्रतिष्ठा हा | न्यायालयाने बंद-खोलीतील (इन-कॅमेरा) सुनावणी, गोपनीयतेचे संरक्षण आणि पीडितेची प्रतिष्ठा |

| | | | |
|---|---|---|---|
| | २ एस. सी. सी. ३८४) | कळीचा मुद्दा आहे. | यांवर भर दिला; तसेच, कोणतीही महिला खोटा आरोप करून स्वतःचीच मानहानी करून घेणार नाही, असेही निरीक्षण नोंदवले. |
| ७. | विशाखा विरुद्ध राजस्थान राज्य ((१९९७) ६ एस. सी. सी.५१८) | कामाच्या ठिकाणी समाजसेविकेचे लैंगिक शोषण. | न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबत विशाखा मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आणि हे स्पष्ट केले की, लैंगिक समानतेमध्ये अशा छळापासून संरक्षणाचाही समावेश होतो. |
| ८. | साक्षी विरुद्ध भारतीय संघराज्य ((२००४) ५ एस. सी. सी ५१८) | लैंगिक गुन्ह्यांचा न्यायचौकशीमध्ये मुलांसाठी अनुकूल/संवेदनशील न्यायालयीन कार्यपद्धती असावी, अशी मागणी एका स्वयंसेवी संस्थेने (NGO) केली. | बाल-पिडीतांना होणारा मानसिक आघात टाळण्यासाठी, बाल-संवेदनशील न्यायनिवाडा पद्धतीचा अवलंब करण्याचे निर्देश माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिले. |
| ९. | अनुज गर्ग विरुद्ध हॉटेल असोसिएशन ऑफ इंडिया ((२००८) ३ एस. सी. सी. १) | मद्यपान सेवा पुरवणाऱ्या ठिकाणी महिलांना काम करण्यास प्रतिबंध  करणाऱ्या कायद्याला आव्हान देण्यात आले. | न्यायालयाने असे अधिनिर्णित केले की, विधिविधानाचे मूल्यमापन केवळ त्याच्या उद्दिष्टांवरून नव्हे, तर त्याच्या परिणामांवरून केले जावे; तसेच, अपवर्जन करणाऱ्या तरतुदी ह्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | घटनाबाह्य ठरवून रद्द केल्या. |
| १०. | सुचिता श्रीवास्तव विरुद्ध चंदीगड प्रशासन ((२००९) ९ एस. सी. सी. १) | बौद्धिक दिव्यांगत्व (मतिमंदत्व) असलेल्या गर्भवती महिलेने गर्भपाताबाबत स्वायत्ततेची मागणी केली | प्रजनन स्वायत्तता हा वैयक्तिक स्वातंत्र्याचाच एक भाग असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले, तसेच याचा मानवी प्रतिष्ठा, शारीरिक पूर्णत्व आणि गोपनीयतेच्या अधिकाराशी थेट संबंध जोडला. |
| ११. | राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण विरुद्ध भारतीय संघराज्य ((२०१४) ५ एस. सी. सी. ४३८) | तृतीयपंथी व्यक्तिंच्या कायदेशीर अधिकारांना मान्यता. | न्यायालयाने तृतीयपंथी अस्मितेला घटनात्मक मान्यता देऊन त्यांच्या प्रतिष्ठेचे समर्थन केले आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सकारात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. |
| १२. | जोसेफ शाईन विरुद्ध भारतीय संघराज्य ((२०१९) ३ एस. सी. सी. ३९) | व्यभिचारविषयक कायद्याला गुन्हा ठरविणाऱ्या कृतीला आव्हान. | माननीय सर्वोच्च न्यायालयाने व्यभिचारविषयक कायद्याला गुन्हा ठरविणाऱ्या कृतीला घटनाबाह्य ठरवून रद्दबादल केले आणि लग्नाबद्दलच्या पितृसत्ताक संकल्पना नाकारल्या. |
| १३. | इंडियन यंग लॉयर्स असोसिएशन | महिलांनी सबरीमाला मंदिरात प्रवेश करण्यावरील बंदीला आव्हान दिले. | माननीय न्यायालयाने असे अधिनिर्णित केले की, जैविक निकषांवर आधारित प्रवेशबंदी ही |

| | | | |
|---|---|---|---|
| | विरुद्ध केरळ राज्य ((२०१९) ११ एस. सी. सी. १) | | प्रतिष्ठा आणि समानतेचे उल्लंघन करणारी आहे आणि न्यायालयाने पुरुषप्रधान चालीरीतींपेक्षा घटनात्मक नैतिकतेला  प्राधान्य दिले. |
| १४. | सचिव, संरक्षण मंत्रालय विरुद्ध बबिता पुनिया ((२०२०) ७ एस. सी. सी. ४६९) | महिला अधिकाऱ्यांनी भारतीय लष्करामध्ये कायमस्वरूपी पदस्थापनेची मागणी केली. | न्यायालयाने महिलांच्या भूमिकेबद्दलचे साचेबंद विचार नाकारले आणि असे अधिनिर्णित केले की,  शारीरिक किंवा सामाजिक गृहीतकांचा आधार घेऊन महिलांना समान संधी मिळण्यापासून वंचित ठेवता येणार नाही. |
| १५. | लेफ्टनंट कर्नल नितीशा विरुद्ध भारतीय संघराज्य ((२०२१) १५ एस. सी. सी. १२५) | सैन्य भरतीमधील वरकरणी तटस्थ वाटणाऱ्या निकषांना आव्हान. | माननीय सर्वोच्च न्यायालयाने परोक्ष भेदभावाची संकल्पना स्वीकारली आणि वास्तविक समानते विषयक विधीतत्वमीमांसेचा पुरस्कार केला. |
| १६. | अपर्णा भट विरुद्ध मध्य प्रदेश राज्य ((२०२१) ३ एस. सी. सी. २४७) | उच्च न्यायालयाने बलात्कार प्रकरणातील सुनावणीदरम्यान साचेबद्ध टिप्पणी केली होती आणि तडजोड करण्याचा सल्ला दिला होता. | न्यायालयाने न्यायाधीशांना लिंगाधारित साचेबंद विचार टाळण्याचे निर्देश दिले आणि बलात्कार प्रकरणांमध्ये विवाह किंवा तडजोडीबाबतचे सल्ले देण्यास सक्त मनाई केली. |
| १७. | भारताचे महान्यायवादी विरुद्ध सतीश ((२०२२) ५ | उच्च न्यायालयाने 'त्वचेचा त्वचेशी संपर्क' या मुद्द्याच्या आधारे आरोपीची  पोक्सो (POCSO) अधिनियमातील | माननीय सर्वोच्च न्यायालयाने अशा पद्धतीचा अर्थ लावण्याचा दृष्टिकोन बाजूला सारला आणि असे अधिनिर्णित केले की, बाल |

| | | | |
|---|---|---|---|
| | एस. सी. सी. ५४५) | आरोपातून निर्दोष मुक्तता केली. | संरक्षण विषयक कायद्याचा अर्थ लावताना त्यामागील उद्देशाचा विचार केला गेला पाहिजे. |
| १८. | पतन जमाल वली विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य ((२०२१) १६ एस. सी. सी. २२५) | एका दलित महिलेवर बलात्कार आणि तिची हत्या. | जात, लिंग आणि दिव्यांगत्व या घटकांच्या परस्पर संयोगातून निर्माण होणाऱ्या दुहेरी/बहुपेडी भेदभावाची दखल घेत न्यायालयाने अंतःसंबंधित भेदभाव मान्य केला. |
| १९. | झारखंड राज्य विरुद्ध शैलेंद्र कुमार राय ((२०२२) १४ एस. सी. सी. २९९) | बलात्कार प्रकरणातील वैद्यकीय तपासणीत 'टू-फिंगर टेस्ट' (दोन बोटांद्वारे तपासणी) चा वापर. | माननीय सर्वोच्च न्यायालयाने ही तपासणी प्रतिगामी आणि संमतीच्या मुद्द्याशी पूर्णपणे अप्रासंगिक असल्याचे सांगत तिचा तीव्र निषेध केला, तसेच ही तपासणी केली जाऊ नये, असे निर्देश दिले. |
| २०. | 'क्ष ' विरुद्ध प्रधान सचिव, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, दिल्ली ((२०२३) ९ एस. सी. सी. ४३३) | एका अविवाहित महिलेने २० आठवड्यांनंतर गर्भपातास नकार देण्याच्या निर्णयाला आव्हान दिले. | न्यायालयाने असे अधिनिर्णित केले की, अविवाहित महिलांनाही प्रजननविषयक स्वायत्ततेचा समान अधिकार आहे आणि विशिष्ट मर्यादित उद्देशांसाठी 'वैवाहिक बलात्कार' ही संकल्पना मान्य केली. |
| २१. | दीपिका सिंग विरुद्ध केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण ((२०२३) १३ | अपरंपरागत कौटुंबिक रचनेमुळे प्रसूती रजा नाकारणे. | न्यायालयाने हे मान्य केले की, समकालीन समाजात कुटुंबे विविध स्वरूपांत अस्तित्वात असतात आणि त्यासोबतच, देखभाल व कौटुंबिक |

| | | | |
|---|---|---|---|
| | एसी. सी. सी. ६८१) | | भूमिकांविषयीच्या साचेबंद समजुती फेटाळून लावल्या. |
| २२. | सुप्रियो उर्फ सुप्रिया चक्रवर्ती आणि अन्य विरुद्ध भारतीय संघराज्य ((२०२३) आय. एन. एस. सी. ९२०) | समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता मिळण्याबाबतची याचिका. | न्यायालयाने कायदेशीर मान्यता देण्यास नकार दिला, परंतु क्विअर (Queer/समलिंगी व इतर) व्यक्तिंच्या सन्मान, स्वायत्तता आणि भेदभावापासून संरक्षणाच्या अधिकारांचा पुनरुच्चार केला. |
| २३. | प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरांवरील कथित बलात्कार आणि हत्या या प्रकरणाच्या संदर्भात ((२०२४) आय. एन. एस. सी. ६१३) | एखाद्या डॉक्टराविरुद्ध घडलेल्या लैंगिक हिंसाचाराबाबत (वैद्यकीय) संस्थेचा प्रतिसाद. | माननीय सर्वोच्च न्यायालयाने संस्थात्मक उत्तरदायित्व, कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण आणि पीडितांची प्रतिष्ठा यांवर भर दिला. |
| २४. | डॉ. सोहेल मलिक विरुद्ध | कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक | न्यायालयाने असे स्पष्ट केले की, अंतर्गत तक्रार समितीच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | भारतीय संघराज्य ((२०२५) एस. सी. सी. ऑनलाईन एस. सी. २७५१) | छळवणूक (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम (POSH Act) मधील अंतर्गत तक्रार समितीच्या अधिकारक्षेत्राला आव्हान. | अधिकारक्षेत्राची व्याप्ती विविध विभागांपर्यंत विस्तारलेली आहे आणि त्यांनी कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम (POSH Act) अधिनियमाच्या निवारणात्मक हेतूचे रक्षण केले पाहिजे. |
| २५. | वनिता पटनायक विरुद्ध निर्मल कांती चक्रबर्ती ((२०२५) आय. एन. एस. सी. ११०६) | कामाच्या ठिकाणी सतत होणाऱ्या लैंगिक छळाची तक्रार. | न्यायालयाने हे मान्य केले की, कामाच्या ठिकाणी असलेले प्रतिकूल वातावरण हे सातत्याने होणाऱ्या छळाचा भाग असू शकते; त्यामुळे 'कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम (POSH Act) अधिनियमांतर्गत त्याचा अर्थ लावताना पीडितेच्या संवेदनशीलतेचा विचार करणे आवश्यक ठरते. |
| २६. | निपुण सक्सेना विरुद्ध भारतीय संघराज्य ((२०१९) २ एस. सी. सी. ७०३) | लैंगिक अपराधांमधील पीडितांची ओळख आणि गोपनीयता यांचे संरक्षण. | न्यायालयाने बलात्कार पीडितांच्या ओळखीचे प्रकटीकरण करण्यावरील वैधानिक प्रतिबंधतेचा पुनरुच्चार केला आणि न्यायिक अभिलेख |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | व प्रसारमाध्यमांमधील वृत्तांकनासह संपूर्ण फौजदारी न्यायदान प्रक्रियेदरम्यान त्यांच्या गोपनीयतेचे आणि प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी सर्वसमावेशक निर्देश जारी केले. |
| २७. | मनीषा रवींद्र पानपाटील विरुद्ध महाराष्ट्र राज्य ((२०२४) आय. एन. एस. सी. ७६२) | शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून बांधलेल्या घरात राहत असल्याच्या आरोपाखाली एका निर्वाचित महिला सरपंचाला पदावरून अपात्र घोषित करण्यात आले. | न्यायालयाने असे मान्य केले की, निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींविरुद्ध होणाऱ्या कायदेशीर आणि प्रशासकीय कारवायांच्या मुळाशी काही वेळा महिलांच्या अधिकाराच्या वापराबद्दल असलेली विरोधाची पुरुषप्रधान मानसिकता असू शकते, विशेषतः ग्रामीण प्रशासकीय रचनेमध्ये हे प्रकर्षाने जाणवते. |

*टीप: वरील तक्ता केवळ उदाहरणादाखल असून लैंगिक न्याय आणि घटनात्मक समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने विकसित केलेल्या व्यापक विधीतत्वमीमांसेचा हा संपूर्ण आढावा नाही.*

=================================================

# पीडितेला दोष देण्याविरुद्ध कायदेशीर संरक्षण

पीडितांना दोष देण्यापासून त्याचे संरक्षण करण्यासाठी, पीडितांचे बलात्काराच्या प्रकरणांमध्ये संरक्षण करणाऱ्या तरतुदी भारतीय कायद्यात आधीपासूनच अस्तित्वात आहेत. या तरतुदी या तत्त्वाला बळकटी देतात की, संमती ही केवळ कथित घटनेच्या परिस्थितीवरूनच निश्चित केली पाहिजे आणि पीडितेच्या वैयक्तिक इतिहासावरून नाही. यामुळे खटल्यादरम्यान पीडितेचे दुय्यम पीडनापासून संरक्षण होण्यास मदत होते, पीडितांची प्रतिष्ठा व गोपनीयतेचा हक्क अबाधित राहतो आणि अधिकाधिक पीडितांना चारित्र्यहननाच्या भीतीशिवाय गुन्ह्यांची तक्रार नोंदवण्यास प्रोत्साहन मिळते. पूर्वीच्या 'भारतीय पुरावा कायद्याच्या' कलम १४६ अन्वये तक्रारदाराच्या लैंगिक प्रतिष्ठेविषयी किंवा चारित्र्याविषयी खोलवर जाण्यास स्पष्ट मनाई करण्यात आली होती. झारखंड राज्य विरुद्ध शैलेंद्र कुमार राय[1] या प्रकरणात या मुद्द्यावर भर देताना न्यायालयाने असे प्रतिपादित केले की, बलात्काराच्या आरोपांशी महिलेचा “लैंगिक इतिहास पूर्णपणे अप्रासंगिक” आहे आणि केवळ ती लैंगिकदृष्ट्या सक्रिय आहे म्हणून तिच्या साक्षीवर विश्वास ठेवता येणार नाही, असे सूचित करणे हे “पितृसत्ताक आणि लैंगिकतावादी” आहे.[2] न्यायालयाने नमूद केले की, भारतीय पुरावा अधिनियमातील कलम ५३ अ मध्ये बलात्काराच्या खटल्यातील संमतीच्या संदर्भात पीडितेचा पूर्वीचा लैंगिक इतिहास “असंबंधित” असल्याचे स्पष्टपणे निर्धारित करण्यात आले आहे.[3] त्याचप्रमाणे, अलाहाबाद उच्च न्यायालयाने अलीकडेच एका वकिलाने बलात्काराच्या पीडितेला “चारित्र्यहीन स्त्री” असे संबोधण्याच्या केलेल्या प्रयत्नाचा निषेध

1 (२०२२)१४ एस. सी. सी. २९९.

2. लैंगिकदृष्ट्या सक्रिय स्त्रीवर बलात्कार होऊ शकत नाही असे गृहीत धरणे हे पितृसत्ताक आणि लैंगिकतावादी आहे, ‘दोन बोट चाचणी’ करणारी कोणतीही व्यक्ती गैरवर्तनास दोषी ठरेल :- सर्वोच्च न्यायालय.
https://www.scconline.com/blog/post/2022/11/01/two-finger-test-banned-sexually-active-women-can-be-raped-guilty-misconduct-supreme-court-legal-updates-research-guidelines-news/#:~:text=,%E2%80%9D

3. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे (सदर तरतूद भारतीय साक्ष अधिनियम (BSA), २०२३ च्या कलम ४८. मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.)

केला आणि अशा प्रकारचा चारित्र्यावरील हल्ला “पूर्णपणे अप्रासंगिक” असून कायद्याने स्पष्टपणे प्रतिबंधित असल्याचे अधिनिर्णित केले.[4] थोडक्यात, भारतीय न्यायालये आता पुन्हा स्पष्टपणे अधोरेखित करीत आहेत की, पीडितेची प्रतिष्ठा किंवा तिचा भूतकाळ हा तिच्या साक्षीच्या विश्वासार्हतेचे निर्धारण करण्यासाठी विचारात घेण्याचा विषय नाही.[5] हे आंतरराष्ट्रीय बलात्कार-संरक्षण मानकांशी सुसंगत आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेतील फेडरल रूल्स ऑफ एव्हिडन्सनुसार, बहुतेक लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये तक्रारदार महिलेचे लैंगिक वर्तन किंवा तिच्या लैंगिक पूर्व-प्रवृत्तीशी संबंधित बाबी पुराव्यात सादर करण्यास मनाई आहे.[6] अशा प्रकारचे नियम तसेच CEDAW (Convention on the Elimination of All Forms of Discrimination against Women) (महिलांविरुद्धच्या सर्व प्रकारच्या भेदभावाचे निर्मूलन करण्याबाबतचे करार), १९७९ मधील अनुच्छेद ५, हे मान्य करतात की महिलेच्या खाजगी आयुष्याबाबत प्रश्न विचारणे म्हणजे केवळ रूढ गैरसमजांना अधिक बळकटी देणे आणि महिलांना गुन्ह्यांची तक्रार नोंदवण्यापासून परावृत्त करणे होय.

## उलट-तपासणी आणि लैंगिक इतिहास

प्रत्यक्षात, पीडित व्यक्तींना अनेकदा संशय निर्माण करण्याच्या उद्देशाने तयार केलेल्या त्रासदायक उलट-तपासणीला सामोरे जावे लागते. या गुन्ह्याची सुनावणी न्यायालयात सुरू झाल्यानंतर पीडित व्यक्तीला सर्वाधिक मानसिक आघात सहन करावा लागतो. अशा प्रकारच्या युक्त्यांवर न्यायाधीशांनी नियंत्रण आणण्यास सुरुवात केली

---

4. बेचन प्रसाद विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि इतर २०२६ ए एच सी : २१०१३.

5. अलाहाबाद उच्च न्यायालयाने बलात्कार पीडितेला “चारित्र्यहीन स्त्री” असे संबोधल्याबद्दल वकिलाची कानउघाडणी केली; न्यायालयाने म्हटले की, अशा प्रकारचे वक्तव्य भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत संरक्षित असलेल्या पीडितेच्या प्रतिष्ठेचे व गोपनीयतेचे उल्लंघन करते.
https://www.scconline.com/blog/post/2026/02/06/rape-survivor-character-assassination-allahabad-hc/#:~:text=The%20Court%20added%20that%20any,of%20the%20%20122.

6. नियम ४१२. लैंगिक अपराधांशी संबंधित प्रकरणे : पीडिता

आहे. उदाहरणार्थ, अलीकडील एका न्यायनिर्णयामध्ये कुप्रसिद्ध "टू-फिंगर टेस्ट" (दोन बोटांची चाचणी) तातडीने बंद करण्याचा आदेश दिला. तसेच, एखादी महिला “लैंगिक संबंधाची सवय असलेली” आहे किंवा नाही, हा प्रश्न बलात्कारासंबंधी निर्णय करण्यासाठी “अप्रासंगिक” असल्याचे न्यायालयाने नमूद केले.[7] न्यायालयाने पुढीलप्रमाणे अधोरेखित केले : “यापेक्षा सत्यापासून अधिक दूर असलेले काहीही असू शकत नाही, आरोपीने तिच्यावर बलात्कार केला आहे किंवा नाही, याचा न्यायनिर्णय करताना महिलेचा लैंगिक इतिहास पूर्णपणे अप्रासंगिक आहे.” न्यायालयाने पुढे नमूद केले की, तिच्या साक्षीचे पुराव्यात्मक मूल्य “तिच्या लैंगिक इतिहासावर अवलंबून नसते.” तसेच, एखादी महिला लैंगिकदृष्ट्या सक्रिय असल्यामुळे तिची साक्ष अविश्वसनीय मानणे हे “पितृसत्ताक आणि लैंगिकतावादी” आहे.

भारतीय न्यायचौकशी न्यायालये देखील अशा कायदेशीर तरतुदींनी बांधील आहेत, ज्या पीडित व्यक्तींप्रती बचाव पक्षाच्या वकिलांनी अवलंबावयाच्या प्रश्नोत्तरांच्या पद्धतीवर मर्यादा घालतात. भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ मधील कलम १५४ आणि १५५ अन्वये, न्यायालयास, साक्षीची तपासणी चालू असताना विचारण्यात येणाऱ्या अश्लील/लज्जास्पद तसेच अपमानास्पद/त्रासदायक प्रश्नांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. प्रत्यक्ष व्यवहारात याचा अर्थ असा होतो की, वकिलांना पीडिते बद्दल संशय निर्माण करण्यासाठी “चारित्र्यहीन स्त्री” अशा स्वरूपाचे शब्द वापरता येणार नाहीत किंवा तिच्यावर लैंगिक स्वैराचाराचे आरोप करता येणार नाहीत. वस्तुत: न्यायालये अशा प्रकारचे अनावश्यक सूचक आरोप हे प्रकरणाशी असंबंधित ठरवून नियमितपणे फेटाळून लावतात. उदाहरणार्थ, मुंबई उच्च न्यायालयाने एका किशोरवयीन मुलीचे दोन प्रियकर असल्याचा आधार घेत, त्यामुळे तिच्यावर

---

7. लीलू उर्फ राजेश विरुद्ध हरियाणा राज्य, (२०१३) १४ एस.सी.सी. ६४३

https://www.law.cornell.edu/rules/fre/rule_412#:~:text=%28a%29%20Prohibited%20Uses,proceeding%20involving%20alleged%20sexual%20misconduct.

बलात्कार करण्याचे समर्थन होऊ शकते, हा युक्तिवाद फेटाळून लावला. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले की, “एखादी स्त्री चारित्र्यहीन असू शकते; परंतु त्याचा अर्थ असा होत नाही की कोणीही संबंधित आणि असंबंधित व्यक्ती तिचा गैरफायदा घेऊ शकतो. तिला ‘नाही’ म्हणण्याचा अधिकार आहे.” माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे प्रतिपादन केले आहे की, एखाद्या प्रकरणात फिर्यादी (पीडिता) भूतकाळात तिच्या लैंगिक वर्तनात स्वैराचारी असली तरीदेखील, कोणत्याही व्यक्तीसोबत किंवा प्रत्येक व्यक्तीसोबत लैंगिक संबंध ठेवण्यास नकार देण्याचा तिचा अधिकार अबाधित राहतो, कारण लैंगिक अत्याचार करण्यासाठी ती कोणत्याही व्यक्तीसाठी सहज उपलब्ध असलेली असुरक्षित वस्तू किंवा भक्ष्य नाही.[8]

## न्यायालयीन संवेदनशीलतेतील विरोधाभास : पुरोगामी दृष्टिकोन आणि कायमस्वरूपी पूर्वग्रह.

अभ्यासाच्या उद्देशाने समितीने देशभरातील विविध न्यायालयांमधील १२५ न्यायचौकशी न्यायालयाच्या न्यायनिर्णयांचे विश्लेषण केले तसेच सर्व राज्यांच्या न्यायिक अकादमींची सहाय्यता घेतली. या न्यायनिर्णयांमधून न्यायाधीशांच्या धारणा, मानसिकता तसेच एखाद्या प्रकरणाचा निर्णय घेताना अवलंबिलेला दृष्टिकोन यांविषयी संमिश्र चित्र समोर आले. काही प्रकरणांमध्ये न्यायाधीशांनी पीडित व्यक्ती, साक्षीदार आणि असुरक्षित घटकांप्रती उच्च पातळीची संवेदनशीलता दर्शविली होती. उदाहरणार्थ, महिला आणि बालकांच्या असुरक्षिततेच्या परिस्थितीची त्यांनी जाणीव ठेवली होती. त्यांनी पीडित व्यक्तीच्या अधिकारांना प्राधान्य दिले आणि त्याच वेळी सामाजिक हितसंबंधांमध्ये समतोल साधला.

‘पंजाब राज्य विरुद्ध गुरमीत सिंग’[9] या भारताच्या माननीय सर्वोच्च

8. दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र राज्य विरुद्ध पंकज चौधरी, (२०१९) ११ एस.सी.सी. ५७५
9. (१९९६) २ एस.सी.सी. ३८४

न्यायालयाच्या १९९६ सालच्या ऐतिहासिक न्यायनिर्णयामध्ये, साक्ष नोंदविताना पीडित व्यक्तीचे सक्रियपणे संरक्षण करण्याचे निर्देश न्यायचौकशी न्यायालयांतील न्यायाधीशांना देण्यात आले. तसेच, पीडित व्यक्तीला लज्जास्पद, अपमानास्पद किंवा धमकीयुक्त प्रश्नोत्तरांना सामोरे जावे लागत असताना न्यायालयांनी मूक प्रेक्षक म्हणून बसून राहू नये, असेही प्रतिपादित करण्यात आले. न्यायाधीशांना हे वास्तव ज्ञात होते की, अशा प्रकारच्या घटनांची तक्रार नोंदविण्यास महिला अनेकदा नाखूष असतात. तसेच, उलटतपासणी ही नैतिक मर्यादा ओलांडत असल्याचे निदर्शनास आल्यास, त्यामध्ये हस्तक्षेप करण्याबाबत न्यायालये पुरेशी सजग व संवेदनशील होती. या न्यायनिर्णयांमधून आधुनिक व लिंगभाव-संवेदनशील न्यायिक दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. या दृष्टिकोनात केवळ आरोपीला सुनावण्यात येणाऱ्या शिक्षेपुरताच विचार मर्यादित न ठेवता, पीडितेस देण्यात येणारी नुकसानभरपाई, तिचे पुनर्वसन तसेच संपूर्ण समाजाच्या हिताचा व्यापक विचार करण्यात आला आहे.

या परिस्थितीची दुसरी बाजू अशी आहे की, "तुम्ही त्या वेळी तेथे का होता?", "तुम्ही अशा प्रकारचे कपडे का परिधान केले होते?", "तुमच्यासोबत कोणताही पुरुष का नव्हता?", "तुम्ही इतक्या उशिरा तक्रार का नोंदविली?" अशा स्वरूपाचे वारंवार शब्दप्रयोग केले जातात आणि प्रश्न विचारले जातात. वैवाहिक वादासंबंधीच्या प्रकरणांमध्ये, महिला तक्रार नोंदविण्यासाठी पोलीस ठाण्यात गेल्यानंतर, त्यांच्याकडे अविश्वासाने पाहून, "आताच का?", "इतकी वर्षे उलटून गेल्यानंतर, तुम्हाला मुले झाल्यानंतर आता तक्रार का? वैवाहिक जीवनात असे घडतच असते", असे प्रश्न विचारले जातात. "तुमची आर्थिक परिस्थिती इतकी चांगली आहे, तुम्ही विशिष्ट प्रकारचे कपडे परिधान केले आहेत, मग तुमची हकीकत खरी आहे का?" अशा प्रकारच्या प्रश्नांचा भडिमार महिलांवर केला जातो. अशा प्रकारच्या मानसिक त्रासाला महिलांना केवळ पोलीस ठाण्यातच नव्हे, तर काही एक-खिडकी केंद्रांमध्ये, सहाय्यक व्यक्तींकडून, कारागृहांमध्ये, रुग्णालयांमध्ये इत्यादी ठिकाणीही सामोरे जावे लागते.[10] न्यायालय हे

10. मध्य प्रदेश राज्य महिला आयोग यांच्याकडून हिंसा, अत्याचार व शोषणाला बळी पडलेल्या महिला पीडितांच्या संदर्भात लिंग-संवेदनशील न्यायदान व्यवस्थेसाठी मार्गदर्शक तत्त्वांकरिता सूचना (नागरी समाजातील विविध घटकांशी सल्लामसलत करून तयार करण्यात आलेल्या नोंदी).

एकमेव असे ठिकाण आहे, जिथे न्यायाधीश अशा सर्व समस्यांचे म्हणणे ऐकून घेतात. महिला न्यायालयासमोर आपले म्हणणे मांडतात, ते केवळ या आशेने की, न्यायाधीश त्यांच्या सन्मानाचे व प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करतील. न्यायाधीशांना त्यांच्या समोरील न्यायालयीन कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार असतो; त्यानुसार, न्यायाधीश न्यायालयीन कर्मचाऱ्यांना पीडितेस आसन उपलब्ध करून देणे, पिण्यासाठी पाणी देणे यांसारख्या मूलभूत सौजन्यपूर्ण सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देऊ शकतात. पीडिता आपली साक्ष नोंदवीत असताना न्यायाधीशांनी अधिक सजग व दक्ष राहणे आवश्यक आहे. पीडितेस अधिक सुसह्य व सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी अनावश्यक व्यक्तींना न्यायालयीन कक्षातून बाहेर जाण्यास सांगितले पाहिजे. न्यायाधीशांनी केवळ पीडितेने व्यक्त केलेल्या शब्दांकडेच नव्हे, तर तिच्या देहबोलीकडेही बारकाईने लक्ष दिले पाहिजे.

न्यायदान व्यवस्थेच्या सर्व स्तरांवर - मग ते पोलीस ठाणे असो, रुग्णालय असो, एक-खिडकी संकट निवारण केंद्र असो किंवा न्यायालय असो - हिंसेला बळी पडलेल्या महिला पीडितांना भेदभावपूर्ण, असंवेदनशील तसेच पीडितेलाच दोषी ठरविणाऱ्या विविध प्रकारच्या वक्तव्यांना सामोरे जावे लागते. पीडित महिलांना नियमितपणे, "घरचीच गोष्ट आहे, एवढं काय झालं?" किंवा "समेट करून घ्या, तुमचे घर टिकून राहील," अशा प्रकारच्या टिप्पण्यांना सामोरे जावे लागते. अशा वक्तव्यांमुळे त्यांच्यावर झालेल्या हिंसाचाराच्या अनुभवाचे गांभीर्य कमी लेखले जाते आणि तडजोड करण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला जातो. पोलीस व इतर संबंधित प्राधिकरणांकडून त्यांच्या वेशभूषेबाबतही आक्षेपार्ह व असंवेदनशील प्रश्न किंवा टिप्पण्या केल्या जातात, जसे की, "लिपस्टिक-लाली लावून तक्रार नोंदवण्यासाठी आला आहात का?" किंवा त्यांच्या हेतूंबाबत संशय व्यक्त करत, "आजकालच्या बायका नाटक करतात," अशा प्रकारची वक्तव्ये केली जातात. पीडित महिलांना त्यांच्या वैयक्तिक जीवनाशी व आचरणाशी संबंधित अप्रासंगिक, अनावश्यक तसेच त्यांच्या वैयक्तिक गोपनीयतेत

हस्तक्षेप करणारे प्रश्नही विचारले जातात. उदाहरणार्थ, “तुम्ही अशा प्रकारचे कपडे घालून वावरता का?” किंवा “घरामध्ये तुमचे वर्तन कसे असते?” अशा स्वरूपाचे प्रश्न विचारले जातात. अशी विधाने पीडितेचा विश्वास वाढवण्याऐवजी, तिच्यावर अधिक मानसिक आघात करतात आणि तिला न्यायाची मागणी करण्यापासून परावृत्त करतात.[11]

मार्गदर्शक सूचना मर्यादेमधील पीडितांच्या साक्षी जबाबांवरून या प्रकारच्या अनुभवांची वास्तविकता अधोरेखित होते. एका पीडित महिलेने आपला अनुभव कथन करताना सांगितले की, तिला स्पष्टपणे दिसून येतील अशा स्वरूपाच्या दुखापती झालेल्या असतानाही, वैद्यकीय तपासणी करण्यापूर्वी तिला रुग्णालयात प्रतीक्षा करण्यास भाग पाडण्यात आले आणि तिच्या “घरातील वर्तनाबाबत” प्रश्न विचारण्यात आले. एका तृतीय पंथी व्यक्तीने दिलेल्या साक्षी जबाबानुसार, “ओळख पडताळणी” करण्याच्या नावाखाली तिला कपडे उतरविण्यास भाग पाडण्यात आले तसेच खोटे जबाब स्वाक्षरी करून देण्यासाठी तिच्यावर दबाव आणण्यात आला. याशिवाय, तिची हेटाळणी करण्यात आली आणि तिच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्यास तसेच तिच्याशी सन्मानपूर्वक वागणूक नाकारण्यात आली. अशा प्रकारची कथने ही पीडितांना, विशेषतः जाती, वर्ग किंवा लिंग आधारित अतिरिक्त भेदभावाचा सामना करावा लागतो अशा वंचित किंवा शोषित पार्श्वभूमीतील पीडितांना, प्रत्येक टप्प्यावर ज्या संस्थात्मक अडथळ्यांना आणि पितृसत्ताक मानसिकतेला सामोरे जावे लागते, ते अधोरेखित करतात. [12]

---

11. मध्य प्रदेश राज्य महिला आयोग यांच्याकडून हिंसा, अत्याचार व शोषणाला बळी पडलेल्या महिला पीडितांच्या संदर्भात लिंग-न्याय्य न्यायदान व्यवस्थेसाठी मार्गदर्शक तत्त्वांकरिता सूचना (नागरी समाजातील विविध संस्थांशी सल्लामसलत करून तयार करण्यात आलेली नोंद).

12. मध्य प्रदेश राज्य महिला आयोग यांच्याकडून हिंसा, अत्याचार व शोषणाला बळी पडलेल्या महिला पीडितांच्या संदर्भात लिंग-न्याय्य न्यायदान व्यवस्थेसाठी मार्गदर्शक तत्त्वांकरिता सूचना (नागरी समाजातील विविध संस्थांशी सल्लामसलत करून तयार करण्यात आलेली नोंद).

मा. केरळ उच्च न्यायालयाने[13] डिसेंबर २०२४ मध्ये वैवाहिक अपील क्र. ७०६/२०२४ या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयात असे प्रतिपादित केले की, पोशाख हे स्वयं-अभिव्यक्तीचे एक माध्यम असून, ते व्यक्तीच्या ओळखीचा किंवा सर्वसाधारण सौंदर्यदृष्टीच्या अभिव्यक्तीचा एक भाग असते. कोणत्याही सुसंस्कृत समाजात केवळ पोशाखावरून स्त्रीचे मूल्यमापन करणे किंवा तिच्या शील अथवा विनयाबद्दल निष्कर्ष काढणे हे अक्षम्य आणि अस्वीकार्य आहे, कारण असे निष्कर्ष पितृसत्ताक पद्धतीच्या रूढ संकल्पनांमध्ये रुजलेले असतात. एखादी स्त्री तिचे कपडे कसे निवडते ही तिची पूर्णपणे वैयक्तिक पसंती आहे, ज्याचे नैतिक मूल्यमापन किंवा परीक्षण केले जाऊ शकत नाही, विशेषतः न्यायालयांद्वारे तर अजिबात नाही."

13. XXXXX V. XXXXX, २०२४ : केरळ : ९१८९८.

## रूढीकरण / ठोकळेबाजी विरुद्धचा नियम

## लिंगन्याय्य समाजाकडे संक्रमण

भारतातील न्यायिक दृष्टिकोनातून, विशेषतः लैंगिक स्वरूपाच्या गुन्ह्यांशी आणि लिंगाधारित न्यायाशी संबंधित प्रकरणांमध्ये, न्यायनिर्णयन करताना लिंगाधारित रूढीबाजपणा किंवा लिंगाधारित शब्दप्रयोग वापरण्याचा ठोकळेबाज पणा  याचा वापर सातत्याने नाकारण्यात आला आहे.

i. अपर्णा भट विरुद्ध मध्य प्रदेश राज्य[14] या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले की, न्यायालयांनी पीडितेच्या वेशभूषा, जीवनशैली, वैवाहिक स्थिती किंवा लैंगिकतेच्या  इतिहासाशी संबंधित रूढीबाजी टाळली पाहिजेत. अशा बाबी संमती किंवा विश्वासार्हतेशी संबंधित नसतात, यावर न्यायालयाने भर दिला आणि न्यायिक संवेदनशीलतेसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता अधोरेखित केली. रूढीवादी न्यायिक निरीक्षणांमुळे निष्पक्षतेला बाधा येते आणि पीडितेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होतो, असे नमूद करून, न्यायालयांनी तटस्थता राखणे आणि असंबद्ध सामाजिक गृहीतकांवर आधारित निष्कर्ष काढणे टाळणे आवश्यक असल्याचे प्रतिपादित करण्यात आले.

ii. संघमित्रा विरुद्ध राज्य[15] या प्रकरणात, एखाद्या व्यक्तीची व्यावसायिक ओळख किंवा त्या व्यक्तीचे लिंग हे न्यायालयीन अनुमानांचा आधार होऊ शकत नाही, असे पुढे स्पष्ट करण्यात आले.

लैंगिकतेबाबतचा इतिहास आणि चारित्र्यावर आधारित युक्तिवाद यांना वगळण्याच्या दृष्टिकोनाला वैधानिक तसेच न्यायशास्त्रीय विकासातून अधिक बळकटी मिळाली आहे. कलंकित करणाऱ्या भाषेचा न्यायालयीन निषेध बोधिसत्त्व गौतम विरुद्ध सुभ्रा चक्रवर्ती[16] या प्रकरणातूनही दिसून येतो. या प्रकरणात लैंगिक हिंसेचे गांभीर्य आणि सामाजिक पूर्वग्रहांचा पीडितांवर होणारा परिणाम यांचा विचार करण्यात आला. मा.

14. उपरोल्लेखित.
15. २०२४ डी एच सी २५२४.
16. (१९९६) १ एस सी सी ४९०.

सर्वोच्च न्यायालयाने अपर्णा भट या प्रकरणात पुढे स्पष्ट केले की, वेशभूषा किंवा पूर्वीचे लैंगिक वर्तन यावरून संमतीचा निष्कर्ष काढता येत नाही आणि "चांगली स्त्री/वाईट स्त्री" या द्विभाजनात्मक दृष्टिकोनास नकार दिलेला आहे.

संवैधानिक न्यायशास्त्राने वैवाहिक आणि लिंगाधारित भूमिकांचे नियमन करणाऱ्या कायद्यांमध्ये अंतर्भूत असलेल्या रूढीवादी दृष्टिकोनांचेही उच्चाटन केले आहे. जोसेफ शाइन विरुद्ध भारतीय संघ राज्य[17] या प्रकरणात, महिलांना निष्क्रिय आणि दुय्यम स्थानावर ठेवणाऱ्या आणि त्यामुळे संविधानाच्या अनुच्छेद १४ व १५ चे उल्लंघन करणाऱ्या भारतीय दंड संहितेतील कलम ४९७ ला रद्दबातल करण्यात आले. त्याचप्रमाणे, शायरा बानो विरुद्ध भारतीय संघ राज्य[18] या प्रकरणात, लिंगाधारित असमानता कायम ठेवणाऱ्या तिहेरी तलाकची प्रथा अवैध ठरविण्यात आली. तर नवतेज सिंग जोहर विरुद्ध भारतीय संघ राज्य[19] या प्रकरणात, विषमलैंगिकतावादी लिंगभूमिका लादणारे कायदे असंवैधानिक असल्याचे प्रतिपादित करण्यात आले आणि समानता व गोपनीयतेच्या अधिकारांच्या आधारे रूढीकरणविरोधी दृष्टिकोनाला घटनात्मक अधिष्ठान देण्यात आले. यश पाल विरुद्ध हरियाणा राज्य[20] या प्रकरणात पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने असे मान्य केले की, पुरुष आणि स्त्रिया यांच्या लैंगिक स्वायत्ततेसाठी भिन्न निकष लागू करण्यास फौजदारी कायद्याच्या माध्यमातून प्रोत्साहन देता येणार नाही.

प्रक्रियात्मक संरक्षणात्मक उपाययोजनांमधूनही रूढीकरणविरोधी हा दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. पंजाब राज्य विरुद्ध गुरमीत सिंग[21] या प्रकरणात, प्रतिष्ठेला होणारी हानी आणि सामाजिक कलंक टाळण्यासाठी बंदिस्त न्यायालयीन कार्यवाहीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध अधिनियम, २०१३ यामध्येही अपमानास्पद किंवा रूढीवादी पद्धतीने प्रश्न

---

17. (२०१९) ३ एस सी सी ३९.
18. (२०१७) ९ एस सी सी १.
19. (२०१८) ३ एस सी सी ३९.
20. सी आर डब्लू पी/४६६०/२०२१/.(२०२४:पीएचएचसी:११८२४५- डीबी).
21. उपरोल्लेखित.

विचारण्यापासून संरक्षण देण्याची तरतूद संस्थात्मक स्वरूपात करण्यात आली आहे. अशा प्रकारचे उल्लंघन संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ आणि २१ अंतर्गत मूलभूत अधिकारांशी संबंधित असल्याचे मान्य करण्यात आले आहे. अपर्णा भट या प्रकरणात उद्धृत करण्यात आलेल्या सी ई डी ए डब्ल्यू आधारित तत्त्वांसह आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे आणि दक्षिण व आग्नेय आशियातील लिंगदृष्टिकोन लागू करण्याबाबत न्यायाधीशांसाठी बँकॉक सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वे (२०२२) यामध्येही न्यायाधीशांनी "खरी पीडित" असण्याबाबतच्या कठोर किंवा रूढ कल्पना टाळाव्यात आणि संदर्भाधारित मूल्यमापनाचा दृष्टिकोन स्वीकारावा, असे निर्देशित करण्यात आले आहे.

रूढीकरणविरोधी न्यायशास्त्राच्या उत्क्रांतीमध्ये पूर्वीचे निर्णय स्पष्टपणे रद्द करण्याची बाबही महत्त्वपूर्ण आहे. जोसेफ शाइन[22] या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने सोमित्री विष्णू विरुद्ध भारतीय संघ राज्य[23] हा निर्णय रद्द करून, स्त्रियांना पतीची मालमत्ता मानणाऱ्या दृष्टिकोनास नकार दिला. त्याचप्रमाणे, नवतेज सिंग जोहर[24] या प्रकरणात सुरेश कुमार कौशल विरुद्ध नाझ फाउंडेशन[25] हा निर्णय रद्द करून, लिंग आणि लैंगिकतेविषयी रूढीवादी दृष्टिकोन लादणाऱ्या कालबाह्य सामाजिक निकषांपेक्षा घटनात्मक नैतिकतेला प्राधान्य असले पाहिजे, असे प्रतिपादित करण्यात आले.

## न्यायनिर्णयांमधील लिंगाधारित/रूढीवादी भाषा आणि त्यास पर्यायी शब्द किंवा शब्द रचना

भारतातील न्यायाधीशांसाठी, प्रकरणांचा निर्णय घेताना किंवा न्यायनिर्णयांमध्ये कारणमीमांसा मांडताना पुरुषप्रधानतेचा आधार किंवा प्रभाव टाळणे ही दीर्घकाळापासूनची चिंता राहिली आहे. पुरुषप्रधानता ही नैसर्गिक घटना आहे, अशी एक चुकीची धारणा आहे; मात्र न्यायाधीश आता या धारणेला सक्रियपणे आव्हान देत आहेत. त्यामुळे संवेदनशील न्यायालयीन भाषा ही केवळ सौजन्याची बाब नसून,

22. उपरोल्लेखित.
23. ए आय आर १९८५ एस सी १६१८.
24. (२०१७) १ एस सी सी ७९१.
25. २०१४) १ एस सी सी १.

न्यायनिर्णयनामध्ये निष्पक्षता, प्रतिष्ठा आणि निःपक्षपातीपणा सुनिश्चित करण्यासाठी ती अत्यावश्यक आहे.

महिला आणि बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये संवेदनशीलतेची आवश्यकता विशेषतः लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसा, छळ आणि अत्याचार यांसारख्या गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता आणखी प्रकर्षाने जाणवते. भारतातील महिलांना आजही पद्धतशीर भेदभाव, लैंगिक हिंसा, कौटुंबिक हिंसा आणि छळ यांचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत रूढीवादी दृष्टिकोनावर आधारित असंवेदनशील न्यायालयीन टिप्पणी किंवा न्यायनिर्णय पीडितांना गुन्ह्यांची नोंद करण्यापासून किंवा न्यायप्रक्रियेत सहभागी होण्यापासून परावृत्त करू शकतात. बेशुद्ध अवस्थेतील महिलांशी संबंधित लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये न्यायालयीन दृष्टिकोनातून अनेकदा "बलात्कारासंबंधीच्या मिथकांचे" पुनरुत्पादन झाले असून, आरोपीच्या वर्तनावर[26] लक्ष केंद्रित करण्याऐवजी पीडितेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. अशा प्रकारची भाषा लैंगिक अत्याचारातून बचावलेल्या व्यक्तींना पुन्हा मानसिक आघात देऊ शकते आणि न्यायाला प्रोत्साहन देण्याऐवजी सामाजिक पूर्वग्रह अधिक दृढ करू शकते.

न्यायालये ही घटनात्मक मूल्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली संस्थाने असल्याने, न्यायाधीशांनी आदरयुक्त, तटस्थ आणि रूढींपासून आणि ठोकळबाजीपासून मुक्त अशी भाषा वापरणे आवश्यक आहे. संवेदनशील न्यायालयीन अभिव्यक्तीमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ होतो, असुरक्षित किंवा संवेदनशील व्यक्तींच्या प्रतिष्ठेचे संरक्षण होते आणि न्यायव्यवस्था ही समानता व मानवी अधिकारांच्या तत्त्वांना प्रतिबिंबित करत आहे याची खात्री होते.

फुल सिंग विरुद्ध हरियाणा राज्य[27] या प्रकरणात, न्यायालयाने वापरलेल्या शब्दप्रयोगाबाबत तसेच शिक्षेबाबत घेतलेल्या निर्णयाबाबत, लिंगाधारित न्यायाच्या

26. एलिझाबेथ ए शीहय, "न्यायाधीश आणि त्यांनी वाजवी पाउले उचलण्याची आवश्यकता : बेशुद्ध अवस्थेत महिलांविरुद्ध लैगिंक अत्याचाराबाबत न्यायालयीन दृष्टीकोन" , कॅनडामधील लैगिंक अत्याचार : कायदा कायदेशीर व्यवहार पद्धत आणि महिलांची चळवळ, ओटावा विद्यापीठ प्रकाशन, २०१२, पृष्ठ ४८३, ४८३ ते ४८५.७.

27. (१९७९) ४ एस सी सी ४१३.

दृष्टिकोनातून विचार केल्यास काही बाबी चिंताजनक ठरतात. या गुन्ह्यातील आरोपी "लैंगिक तणाव" ("sex stress") मुळे प्रवृत्त झाला होता, असे नमूद करण्यात आले होते आणि इतर काही शब्दप्रयोगदेखील आजच्या काळात अनुचित मानले जाऊ शकतात. समकालीन न्यायशास्त्रामध्ये लैंगिकतेशी संबंधित प्रकरणांमध्ये संवेदनशील शब्दप्रयोगाचा वापर हा न्यायनिर्णय लेखनाचा एक महत्त्वपूर्ण घटक बनला आहे.

खालील जंत्री ही १२५ न्यायचौकशी न्यायालयांच्या न्यायनिर्णयांचे विश्लेषण केल्यानंतर तयार करण्यात आली आहे आणि त्यामध्ये रूढीवादी स्वरूपाचे काही सामान्य शब्ददेखील समाविष्ट करण्यात आले आहेत, जे टाळले जाऊ शकतात. या शब्दावलीमध्ये सदर न्यायनिर्णयांमध्ये आढळून आलेली समस्यात्मक किंवा कालबाह्य वाक्यरचना/शब्दप्रयोग नमूद करण्यात आले असून, कायदेशीर संदर्भात वापरता येतील असे तटस्थ पर्यायी शब्दप्रयोग सुचविण्यात आले आहेत.

| **पारंपरिक/समस्यात्मक शब्दप्रयोग** | **तटस्थ व कायदेशीर दृष्ट्या योग्य पर्याय** |
|---|---|
| स्त्रियांचे शरीर हे खेळाचे मैदान | तक्रारदार / पीडित व्यक्तीच्या शारीरिक स्वायत्ततेचे उल्लंघन केले. |
| असहाय स्त्री; असहाय महिला | बचावलेली व्यक्ती / तक्रारदार |
| ज्या ठिकाणी स्त्रियांचा सन्मान केला जातो, तेथे देव आनंदाने वास करतात. | धार्मिक/सांस्कृतिक संदर्भ टाळावेत; कायदेशीर अधिकारांवर लक्ष केंद्रित करावे. |
| यामुळे एका असहाय स्त्रीच्या आत्म्याचाच नाश होतो | या गुन्ह्यामुळे बचावलेल्या व्यक्तीस गंभीर मानसिक आघात झाला |
| पीडितत्व; आत्म्याचा नाश | बचावलेल्या व्यक्तीस हानी / मानसिक आघात झाला |
| महिला सदस्य / व्यक्ती (पीडितांसाठी) | पीडित / बचावलेली व्यक्ती / तक्रारदार |
| गोल्ड डिगर (आर्थिक हेतू असलेली स्त्री) | अनुमान टाळावे; पुराव्यावर लक्ष केंद्रित |

| | |
|---|---|
| | करावे |
| मानसिक न्युरोसिसने ग्रस्त | त्या बचावलेल्या व्यक्तीस मानसिक आघात / त्रास होत असण्याची शक्यता आहे |
| परवानगी न देणाऱ्या समाजातील स्त्री | रूढीवादी समाजातील व्यक्ती |
| महिलांना मुक्तपणे फिरू देणे | सर्व व्यक्तींना मुक्तपणे व सुरक्षितपणे संचार करण्याचा अधिकार आहे |
| स्वाभिमानी स्त्री | कोणत्याही विशेषणाशिवाय "महिला / स्त्री" असा शब्दप्रयोग करावा |
| गरीब असहाय अल्पवयीन मुलगी | अल्पवयीन पीडित / बचावलेले बालक |
| संप्रेरकांतील बदल, इच्छा, प्रलोभन | पूर्णपणे आवश्यक असल्याशिवाय शारीरिक / जैविक कारणांचे स्पष्टीकरण देणे टाळावे |
| तिला फूस लावून नेण्यात आले (सद्भावनेच्या अर्थाने) | विश्वास संपादन करून आरोपीने पीडितेला प्रलोभन दाखवून नेले / अपहरण केले |
| सन्मान , लज्जा | "सन्मान" / "लज्जा" हे शब्द टाळावेत; बचावलेल्या व्यक्तीच्या अधिकारांवर लक्ष केंद्रित करावे |
| दुसऱ्या व्यक्तीच्या वासनेची बळी | बळी पडलेली व्यक्ती / लैंगिक अत्याचारातून बचावलेली व्यक्ती |
| कलंक हा अपरिहार्य परिणाम | न्याय व पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करावे |
| शीलभंग केला | लैंगिक अत्याचार / शारीरिक स्वायत्ततेचे उल्लंघन |
| महिला असल्यामुळे गंभीर आरोग्यविषयक | पीडित / अत्याचारातून बचावलेल्या |

| | |
|---|---|
| परिणाम | व्यक्तीवर झालेले गंभीर आरोग्यविषयक परिणाम |
| मुलीच्या आयुष्यावर कायमस्वरूपी परिणाम | बचावलेल्या व्यक्तीस दीर्घकाळ सहाय्याची आवश्यकता भासू शकते; तिच्या पुनर्वसनावर लक्ष केंद्रित असावे. |
| तिने आपले शील गमावले | बचावलेल्या व्यक्तीच्या शारीरिक स्वायत्ततेचे उल्लंघन झाले |
| आरडाओरड केली नाही, दरम्यान शांतता बाळगली (घटनेनंतर पीडितेच्या वर्तनाचे वर्णन करताना) | पीडितेला दोष देण्याचे टाळावे; वस्तुस्थितीवर लक्ष केंद्रित करावे. |
| भोळी-भाबडी किंवा आज्ञाधारक मुलगी | अल्पवयीन / पीडित बालक |
| ती संमती देणारी पक्षकार होती | अल्पवयीन व्यक्तीची संमती कायद्याच्या दृष्टीने वैध नसते |
| प्रभाव टाकून शिकवून तयार केलेले बालक | बालक साक्षीदार; त्याच्यावर प्रभाव टाकण्यात आल्याचे अनुमान टाळावे |
| शीलभंग करण्याचा प्रयत्न | लैंगिक अत्याचाराचे कृत्य / शारीरिक स्वायत्ततेचे उल्लंघन |
| कामवासनेने धुंद होऊन | लैंगिक हिंसा, गुन्ह्याचे कारण "वासना" असल्याचे नमूद करणे टाळावे. |
| अभियोजिका | पीडित / बचावलेली व्यक्ती / तक्रारदार |
| असहाय महिलेच्या आत्म्याचे अधःपतन केले | बचावलेल्या व्यक्तीस गंभीर हानी झाली |
| तिचे बालपण नासवले / आयुष्य उद्धस्त केले | गुन्ह्याचे गंभीर परिणाम झाले; सहाय्यावर |

| | |
|---|---|
| | लक्ष केंद्रित करावे |
| अल्पवयीन मुलगी / बालिका | पीडित बालक/ बचावलेले बालक |
| त्याची निषिद्ध वासना तृप्त करणे | लैंगिक अत्याचार केला / कायद्याचे उल्लंघन केले |
| आयुष्यभर तिला ती दुःखद आठवण पछाडत राहील. | बचावलेल्या व्यक्तीस दीर्घकाळ आव्हानांचा सामना करावा लागू शकतो |
| शारीरिक संबंध (बलात्कार / लैंगिक अत्याचारासाठी) | लैंगिक अत्याचार / बलात्कार (कृत्य हे असंमतीने झालेले असल्यास आणि / किंवा पीडित व्यक्ती अल्पवयीन असल्यास) |
| विवस्त्र करणे (जोपर्यंत कायद्यात तसा शब्दप्रयोग केलेला नाही) | कपडे जबरदस्तीने काढणे (लैंगिक अत्याचाराचा एक भाग) |
| कुटुंबाची प्रतिष्ठा आणि सामाजिक दर्जा पणाला लागला आहे | पीडित / बचावलेल्या व्यक्तीला झालेल्या हानीवर लक्ष केंद्रित करावे; “सन्मान”, लज्जित; हे शब्द टाळावे. |
| राहिलेले व्रण आयुष्यभर कायम राहतात | बचावलेल्या व्यक्तीस दीर्घकाळ सहाय्याची आवश्यकता भासू शकते; पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करावे. |
| असहाय महिला | बचावलेली व्यक्ती |
| तिचे गुप्तांग / छाती / योनी, पीडित मुलगी. | बालक / बचावलेल्या व्यक्तीच्या संदर्भात तटस्थ वैद्यकीय / कायदेशीर संज्ञांचा वापर करावा. |
| आरोपीने स्वतःच्या नातीप्रमाणे तिच्याशी वर्तन केले | कुटुंबीय संबंधांऐवजी, वयातील फरक आणि अधिकार, प्रभाव यावर लक्ष केंद्रित करावे. |
| जीवन उद्धस्त केले, विश्वासघात, लज्जास्पद | बचावलेल्या व्यक्तीस गंभीर हानी झाली |

| | |
|---|---|
| वर्तन | |
| शील | शारीरिक स्वायत्तता |
| सन्मानाला / प्रतिष्ठेला धक्का पोहोचवतो | बचावलेल्या व्यक्तीच्या शारीरिक स्वायत्ततेचे आणि अधिकारांचे उल्लंघन |
| मुलगी सहज (शोषणास किंवा अत्याचारास) बळी पडू शकते. | सर्व बालकांना कायद्यांतर्गत संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे. |
| लैंगिक गुलाम | बचावलेल्या व्यक्तीस नियंत्रणाखाली ठेवून वारंवार लैंगिक हिंसा / शोषणास बळी पडलेली अशी ती बचावलेली व्यक्ती. |
| वेश्यालयाचा मालक | मानवी तस्करी / लैंगिक शोषण करणारी व्यक्ती (कायद्यात आवश्यक असल्यास "वेश्यालय" हा शब्द वापरता येईल) |
| निर्दोष / उत्कृष्ट चारित्र्य (पीडितेच्या चारित्र्याबाबत) | लैंगिक स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये चारित्र्यविषयक पुरावा असंबद्ध आहे |
| वासना तृप्ती | लैंगिक हिंसा / लैंगिक अत्याचाराचे कृत्य. विवेकबुद्धी - गुन्ह्याचे गांभीर्य कमी करणारा शब्दप्रयोग टाळावा |
| अशिक्षित / गावंढळ साक्षीदार | साक्षीदार (शिक्षणाचा उल्लेख केवळ तो कायदेशीरदृष्ट्या संबंधित असल्यास करावा) |
| वेश्या (अपमानास्पद शब्द) | बचावलेली व्यक्ती / पीडित व्यक्ती |
| भावनांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थता, पुरुषप्रधान समाज | गुन्ह्याचे समर्थन किंवा तर्कसंगतीकरण टाळावे; उत्तरदाईत्व आणि कायद्यावर लक्ष केंद्रित करावे. |

अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयांना अशा परिस्थितींशी संबंधित बाबींचा विचार करावा लागतो, ज्यामध्ये व्यक्तींचे पती-पत्नीव्यतिरिक्तही, इतर व्यक्तींसोबत अन्य स्वरूपाचे संबंध असतात. औपचारिकरीत्या विवाहबद्ध नसलेल्या व्यक्तींमधील सहजीवनाच्या संबंधांना काही प्रमाणात मान्यता प्राप्त झाली आहे.

अशा परिस्थितींमध्ये, विशेषतः महिलांच्या संदर्भात, उपस्त्री, रखेल आणि रखैल यांसारखे शब्द टाळले जाऊ शकतात. जोडीदार हा त्यासाठी आदर्श पर्यायी शब्द ठरेल आणि तो समलिंगी संबंधांनाही लागू होईल. अन्यथा, महिलांच्या संदर्भात 'गर्लफ्रेंड' (मैत्रीण) हा शब्ददेखील वापरता येऊ शकतो. वेश्या, पैशांच्या बदल्यात लैंगिक सेवा पुरवणारी महिला, वाईट चालीची महिला आणि शैय्या-सोबत करणारी स्त्री, यांसारखे शब्द सामान्य व्यवहारात मोठ्या प्रमाणावर वापरले जातात; मात्र त्यांच्या ऐवजी लैंगिक सेवा देणारी व्यक्ती हा शब्द वापरता येऊ शकतो, कारण आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने (आय एल ओ ) ने देखील हा शब्द अधिक स्वीकारलेला आणि मान्यताप्राप्त शब्द म्हणून वापरला आहे. तथापि, 'वेश्या' हा शब्द केवळ कायद्यात त्याचा वापर आवश्यक असल्यासच वापरला जाऊ शकतो.

भिन्न लैंगिक अभिमुखता असलेल्या व्यक्तींसाठी एल जी बी टी क्यू आय ए + हा एक व्यापक संज्ञा-समूह म्हणून वापरला जातो. समलिंगी संबंध ठेवणारे हा शब्द सर्वसाधारण वापरात असला तरी त्याऐवजी, 'गे' (समलैंगिक संबंध ठेवणारा पुरुष) हा शब्द वापरता येऊ शकतो. महिलांसाठी 'लेस्बियन' ( समलैंगिक संबंध ठेवणारी स्त्री ) हा शब्द अद्याप स्वीकारार्ह आहे. उत्तर भारतात तृतीय लिंगासाठी (तृतीयपंथी) 'हिजडा' हा शब्द वापरला जातो; तमिळनाडूमध्ये 'तिरुनानगई' हा शब्द ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) महिलेसाठी, तर 'तिरूनाम्बी' हा शब्द ट्रान्सजेंडर पुरुषासाठी वापरला जातो. कर्नाटकमध्ये लिंग वैविध्य असलेल्या समुदायांमध्ये जोगप्पा हा शब्द वापरला जातो. हे शब्द अप्रत्यक्षपणे अवमानकारक स्वरूपाचे आहेत आणि आता स्वीकारार्ह व सन्मानजनक संज्ञा म्हणून 'इंटरसेक्स' आंतरलैंगिक हा शब्द वापरला जातो. न्यायालयीन भाषेमध्ये या संज्ञांचा वापर करणे उचित ठरू शकते. सध्या 'एस ओ जी आय इ एस सी'

(लैंगिक अभिमुखता, लिंग ओळख, लिंग अभिव्यक्ती आणि लैंगिक वैशिष्ट्ये) या संज्ञांचे संक्षिप्त रूप / परिवर्णी शब्द आहे आणि आता ही संज्ञा देखील स्वीकारार्हता प्राप्त करीत आहे.

या संदर्भात, लिंगसमानतेसंबंधी युनिसेफने प्रकाशित केलेल्या संज्ञा व संकल्पनांची शब्दावली म्हणजे:-

(https://www.unicef.org/rosa/media/1761/file/Genderglossarytermsandconcepts.pdf) या प्रकाशनाचा संदर्भ घेणे उपयुक्त ठरू शकते. या प्रकाशनामध्ये जगातील विविध प्रदेशांतील संवेदनशीलतेचा विचार करून संज्ञा आणि संकल्पनांची विस्तृत यादी देण्यात आलेली आहे.

# संवेदनशील आणि सहानुभूतीपूर्ण न्यायालयीन कार्यपद्धती

भारतीय न्यायव्यवस्था ही पारंपरिक, आरोपी-केंद्रित व्यवस्थेकडून पीडित-केंद्रित व्यवस्थेकडे म्हणजेच त्यांचे खाजगीपण, सन्मान आणि मानसिक स्वास्थ्य जपणाऱ्या व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत आहे. गुन्ह्यानंतरचे दुय्यम पीडन कमी करणे आणि त्यांचे पूर्णतः पुनर्वसन होईपर्यंत त्यांना आधार देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे आणि त्यामुळे केवळ अपराध्यांना शिक्षा देण्याबरोबरच पीडितांना बरे होण्यास आणि सावरण्यास मदत करण्याच्या दृष्टीने बदल घडत आहे. पीडित नुकसानभरपाई योजना, २०१८ (जोडपत्र II) हे त्यादृष्टीने टाकलेले एक पाऊल आहे. तसेच, विविध कल्याणकारी कायद्यांमध्ये देखील या संदर्भात निर्देश देण्यात आले आहेत.

अशा स्वरूपाचे प्रकरण सत्र न्यायाधीशांचे न्यायालय/न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात आल्यापासूनच संबंधित पीठासीन अधिकाऱ्यांनी तपासी अधिकाऱ्याकडे अशी चौकशी करणे आवश्यक आहे की पीडित व्यक्तीला विधी सहाय्यविषयक सेवा पुरवणेकामी *दिल्ली डोमेस्टिक वर्किंग विमेन्स फोरम वि. भारतीय संघराज्य*[28] या प्रकरणात दिल्या गेलेल्या निर्देशांचे पालन केले गेले आहे किंवा नाही. पोलिसांनीदेखील पीडितेची चौकशी करण्यापूर्वी तिला तिचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी प्रतिनिधी मिळण्याचा अधिकार असल्याची माहिती तिला देणे आणि तसा उल्लेख त्यांच्या अहवालात करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे.

सदर निर्देश ठामपणे प्रथम खबर अहवाल नोंदवल्याच्या वेळेपासून खटला संपेपर्यंत बलात्कार पीडितेस सहाय्य सुनिश्चित करण्याचे बंधन तपासी अधिकाऱ्यांवर घालून देतात. हे इतर स्वरूपाच्या गंभीर अपराधांमधील पीडित व्यक्तींसाठीदेखील लागू केले जाऊ शकते.

जर पीडित व्यक्तीस विधीविषयक सहाय्य पुरवण्यात आले नसेल किंवा पीडित व्यक्तीने खाजगी वकील नेमलेला नसेल किंवा पीठासीन अधिकाऱ्याचे तपासी

28. (१९९५) १ एस.सी.सी. १४.

अधिकाऱ्याच्या उत्तराने समाधान झाले नसेल, तर न्यायालयाने, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास त्यासंबंधी उपाययोजना करण्याचे थेट निर्देश देणे आवश्यक आहे किंवा ते तपासी अधिकाऱ्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास, तपासी अधिकाऱ्याने ४८ तासांच्या आत लेखी पूर्तता करण्याच्या आग्रहासह, सदर निर्देशांचे पालन सुनिश्चित करण्याचे निर्देश देऊ शकते.

जिल्ह्यातील लैंगिक अत्याचाराच्या अपराधांमधील पीडित व्यक्तींच्या मदतीसाठी पोलीस स्थानक स्तरावर वकिलांच्या नियुक्त्यांवर प्रमुख जिल्हा न्यायाधीश, पोलीस अधीक्षक आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यांच्या मासिक बैठकीद्वारे नियतकालिक देखरेख करण्याने या मुद्द्याचे प्रभावीपणे व्यवस्थापन केले जाऊ शकते. पर्यायीरीत्या, या आवश्यकतेची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी पोलीस अधीक्षकांचा लेखी मासिक अहवाल प्रमुख जिल्हा न्यायाधीशांना सादर करण्यात यावा.

## पीडित/साक्षीदार संरक्षण उपाययोजना

पीठासीन अधिकाऱ्याने पीडित व्यक्तीच्या किंवा असुरक्षित साक्षीदाराच्या अर्जाची वाट बघता कामा नये कारण पीडित व्यक्ती/साक्षीदाराचे संरक्षण सुनिश्चित करण्याचे पीठासीन अधिकाऱ्यावर कायदेशीर बंधन आहे. *महेंद्र चावला वि. भारतीय संघराज्य*[29] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने तयार केलेल्या साक्षीदार संरक्षण योजना, २०१८ ला मंजुरी दिली. या योजनेमध्ये, साक्षीदारांचे धोक्याच्या शक्यतेनुसार अ, ब आणि क अशा गटांमध्ये वर्गीकरण केले गेले होते. *साक्षी वि. भारतीय संघराज्य*[30] या प्रकरणात, लैंगिक अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये पुरावा नोंदवण्याचा पीडित-केंद्रित आणि बाल-स्नेही दृष्टिकोन स्वीकारला गेला होता.

## पीडित व्यक्तींचे खटला-पूर्व समुपदेशन

चिंता दूर करण्याच्या दृष्टीने आणि आत्मविश्वास वाढवण्याच्या दृष्टीने ही एक

29. (२०१९) १४ एस.सी.सी. ६१५.

30. (२००४) ५ एस.सी.सी. ५१८.

महत्वाची यंत्रणा आहे. न्यायचौकशी न्यायाधीशांनी पीडित व्यक्तींचे असे समुपदेशन व्हावे हे सुनिश्चित केले पाहिजे.

## कक्षांतर्गत न्यायचौकशी

लैंगिक अपराधविषयक आणि संवेदनशील प्रकरणांची न्यायचौकशी कक्षांतर्गत पद्धतीने करणे आवश्यक आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३६६(१) मध्ये असे नमूद आहे की कोणत्याही अपराधाच्या न्यायचौकशीवेळी न्यायालये जनतेसाठी खुली असली पाहिजेत. पोट-कलम (२) मध्ये त्यास अपवाद नमूद करण्यात आला आहे की बलात्कार किंवा भारतीय न्याय संहितेच्या (बी.एन.एस.) कलम ६४, ६५, ६६, ६७, ६८, ७० किंवा ७१ मधील अपराध किंवा लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या कलम ४, ६, ८, आणि १० मधील अपराधांची न्यायचौकशी कक्षांतर्गत पद्धतीने झाली पाहिजे. त्यासंबंधीच्या मजकुराचे मुद्रण किंवा प्रकाशन करणे प्रतिबंधित जरी असले तरी नावे आणि ओळख गुप्त राखण्याच्या अटीवर त्यास परवानगी दिली गेली आहे. *निपुण सक्सेना वि. भारतीय संघराज्य*[31] या प्रकरणात निर्णीत केल्याप्रमाणे, कोणत्याही कार्यवाहीत पीडित व्यक्तीची ओळख उघड करण्यास परवानगी नाही आणि केवळ आद्याक्षरांच्या किंवा टोपणनावांच्या उपयोगास मंजुरी आहे.

## साक्षीदारांना अतिथी समजणे :

न्यायदानाचे कामी साक्षीदार महत्वाचे असतात आणि न्यायालयाने त्यांना अतिथी सारखे वागवले पाहिजे. परंतु, अनेक साक्षीदारांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागते आणि न्यायालयात चांगली वागणूक मिळत नाही, ज्यामुळे साक्ष देण्यापासून ते परावृत्त होऊ शकतात. न्यायालयांनी साक्षीदारांना सन्मानाने वागवले पाहिजे आणि त्यांचा गरजा पूर्ण होत असल्याचे सुनिश्चित केले पाहिजे. *उत्तर प्रदेश राज्य वि. शंभुनाथ सिंग*[32] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने भारतीय न्यायालयांमधील साक्षीदारांच्या कष्टाचे

---

31. (२०१९) २ एस.सी.सी. ७०३.

32. २००१ (४) एस.सी.सी. ६६७.

वर्णन खालील उताऱ्यामध्ये केले आहे.

"भारतामध्ये न्यायालयांचे समन्स येताच साक्षीदार थरथर कापतात; परंतु ते न्यायालयातील तपासणीच्या किंवा उलट तपासणीच्या भीतीने नव्हे तर या भीतीने की कित्येक दिवस त्यांची साक्षच घेतली जाणार नाही आणि अशा सर्व दिवशी त्यांना आपली साक्ष घेतली जाण्याची वाट बघत न्यायालयाच्या आवारातच थांबून राहावे लागेल. साक्षीदार नाईलाजाने आपले काम सोडून न्यायालयात येतात आणि तासनतास वाट पाहत राहतात आणि दिवसाच्या शेवटी त्यांना परत येण्यास आणि अशा प्रकारे वाट पाहण्यास सांगितले जाते. साक्षीदारांच्या बाबत अनेक भारतीय न्यायालयांमध्ये असे दुर्दैवी दृश्य दिसते. आता वेळ आली आहे की, न्यायचौकशी न्यायालयांनी साक्षीदारांना बोलावलेले अतिथी (समन्सद्वारे) समजले पाहिजे जे आपल्या साक्षीद्वारे अशा न्यायालयांना न्यायिक निष्कर्षापर्यंत पोचण्यास मदत करतात. परंतु, समस्या अशी आहे की खुद्द पक्षकारांपेक्षाही साक्षीदारांची अवस्था अधिक वाईट आहे. या प्रकरणामध्ये, अनेक दिवस सत्र न्यायालयामध्ये हजेरी लावून देखील ज्यांची संपूर्ण साक्ष नोंदवण्यात आली नाही अशा साक्षीदारांनी सहन केलेले दुःख आणि त्रास दिसून येतो. अशा साक्षीदारांची तपासणी टाळण्यात यशस्वी झालेल्या पक्षाला शेवटी त्याचा फायदा झाला जेव्हा सत्र न्यायालयाने पुराव्याअभावी त्यांची निर्दोष मुक्तता केली. उपरोक्त प्रक्रियेत फौजदारी न्यायाचा मात्र बळी गेला."[33]

हे तत्त्व फौजदारी प्रकरणांना अधिक प्रभावीपणे आणि तीव्रतेने लागू होते कारण अशी बरीच प्रकरणे साक्षीदारांच्या, विशेषतः प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या, ज्यांनी प्रत्यक्ष घटना/गुन्हा घडताना पाहिलेला असू शकतो, साक्षींवर निर्णीत केली जातात.

## दुय्यम पीडनास प्रतिबंध

दुय्यम पीडन म्हणजे विशेषतः लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, बालकांचे शोषण, कामाच्या ठिकाणचा छळ आणि लिंगाधारित हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये मूळच्या घटनेनंतर संस्थात्मक, कायदेविषयक, वैद्यकीय, सामाजिक आणि तपासाच्या

---

33. २००१ (४) एस.सी.सी. ६६७.

असंवेदनशील प्रक्रियांमुळे पिडीतांनी पुन्हा सोसलेला क्लेश होय. न्यायाधीशांनी साचेबध्द किंवा दोष देणारे प्रश्न विचारणे टाळले पाहिजे आणि पीडितांना आरोपींशी संवाद करण्यास भाग पाडता कामा नये. न्यायाधीशांची सक्रिय भूमिका पीडितांसाठी आणखी सुरक्षित वातावरण निर्माण करते. तसेच, आघाताची जाणीव ठेवणाऱ्या न्यायदान पद्धतीचा अवलंब करणे, पुनः तेच प्रश्न विचारणे टाळणे, गुप्तता राखणे आणि स्पष्ट संवाद इत्यादी उपायांनी दुय्यम पीडनास प्रतिबंध करता येऊ शकतो. न्यायालयाकडे स्पष्ट आकलनयोग्य धोरणे आणि सुलभ मदत प्रणाली असली पाहिजे. तसेच, पीडिताबद्दलचा कलंक आणि गैरसमज दूर करण्यासाठी जनजागृती आणि शिक्षण मोहिमांचे लोकांकरिता आयोजन केले पाहिजे आणि लिंगाधारित आणि नैतिक टिप्पण्यांवर कडक प्रतिबंध असला पाहिजे.

*अपर्णा भट वि. मध्य प्रदेश राज्य*[34] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने साचेबध्द प्रश्न विचारणे टाळण्याचे निर्देश न्यायाधीशांना दिले. आदेशांमध्ये पीडितांना दोष देणारी भाषा वापरता कामा नये किंवा जामिनामध्ये अशा अटी घालता कामा नये ज्या पिडीतास आरोपीशी संवाद करण्यास भाग पाडतील; कारण न्यायाधीशांची केवळ “सक्रिय भूमिका” देखील सुरक्षित वातावरण सुनिश्चित करू शकते.

## सक्रिय न्यायाधीश आणि उलट तपासणी

पीडितांच्या साक्षीच्या वेळी आणि विशेषतः उलट तपासणीच्या वेळी त्यांचे संरक्षण करणे आणि त्याच वेळी आरोपीचा हक्क अबाधित ठेवणे यामध्ये समतोल राखणे अतिशय महत्वाचे आहे. पोक्सो अधिनियम, २०१२ अस्तित्वात येण्यापूर्वी, *साक्षी वि. भारतीय संघराज्य*[35] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने बाल साक्षीदार किंवा असुरक्षित साक्षीदार यांच्यासाठी, त्यांचे आरोपीशी क्लेशदायकरित्या समोरासमोर येणे टाळण्यासाठी व्हिडिओ लिंक तयार करण्याचे किंवा पडद्यामागे साक्ष नोंदवण्याचे निर्देश

---

34. उपरोल्लेखित.

35. (२००४) ५ एस.सी.सी. ५१८.

दिले होते. न्यायाधीशांनीदेखील अनुचित प्रश्नांवर, विशेषतः पिडीताच्या लैंगिक इतिहासाविषयीच्या प्रश्नांवर नियंत्रण ठेवले पाहिजे आणि असे प्रश्न केवळ तेव्हाच विचारले जातील जेव्हा ते अत्यंत आवश्यक असतील हे सुनिश्चित केले पाहिजे.

## पोक्सो अधिनियम आणि भारतातील बाल संरक्षण कायदे

अधिनियमाच्या कलम २४ प्रमाणे बालकाचा पूर्व-जबाब नोंदवण्याचे काम महिला अधिकाऱ्याने बालकाच्या घरी किंवा बालकाच्या पसंतीच्या इतर ठिकाणी केले पाहिजे आणि त्यावेळी बालकास आरोपी व्यक्ती दिसता कामा नये. *बचपन बचाओ आंदोलन वि. भारतीय संघराज्य*[36] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने पुनःपीडन टाळण्यासाठी प्रथम खबर अहवाल नोंदवल्याच्या वेळेपासून बालकाच्या वतीने पोलीस यंत्रणा, वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णालयांशी संवाद करतील अशा “आधार देणाऱ्या व्यक्ती”, बालकासाठी देण्याचे निर्देश दिले होते. तसेच, त्यामध्ये गुन्ह्याची दखल घेतल्यापासून एका वर्षाच्या आत न्यायचौकशी पूर्ण करण्याचे बंधन देखील घालून देण्यात आले आहे. असुरक्षित साक्षीदार साक्ष केंद्रांच्या स्थापनेमुळे विविध प्रश्न सुलभ झाले असून बी.एन.एस. कायद्यामधील विविध गंभीर अपराधांच्या न्यायचौकशीमध्ये अनेक स्तुत्य तरतुदींचा उपयोग केला जाऊ शकतो.

# विचारार्थ मुद्दे

## १. तथ्याधारित संदर्भ

न्यायिक मीमांसा ही पुराव्यांवर आधारित असली पाहिजे; पीडिताच्या वर्तनाविषयीच्या किंवा चारित्र्याविषयीच्या साचेबध्द धारणा, गृहीतके किंवा नैतिक दृष्टिकोनावर नाही. न्यायालयांनी साक्ष, वैद्यकीय पुरावा, न्यायवैद्यकीय सामग्री आणि भोवतालची परिस्थिती यावर भिस्त ठेवली पाहिजे.

---

36. २०२३ एस.सी.सी. ऑनलाईन एस.सी. १०३१.

*पंजाब राज्य वि. गुरमीत सिंग*[37] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयांना लैंगिक अपराधाविषयीच्या प्रकरणांमध्ये चुकीच्या समजुती आणि साचेबध्द धारणांनी प्रभावित न होण्याचा इशारा दिला.

## २. "विनयभंग करणे" यासारखे शब्दप्रयोग करण्यापासून सावधानता

जरी वरील शब्दप्रयोग कायदेविषयक चौकटीचा भाग असला तरी तो सावधपणे वापरला पाहिजे कारण तो नैतिकतेवर आधारित कल्पना किंवा पितृसत्ताक कल्पना दर्शवू शकतो. प्रतिष्ठा, शारीरिक स्वायत्तता आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे उल्लंघन हेच केंद्रस्थानी राहिले पाहिजे.

*रूपन देओल बजाज वि. के.पी.एस. गिल*[38] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने "विनय" याचा अर्थ स्त्रीच्या प्रतिष्ठेच्या संदर्भात लावला आहे.

## ३. आघाताची जाणीव असणारी भाषा वापरावी; विरोध न करणे म्हणजे संमती नव्हे

शरीरावर जखमा नसणे, उशिराने माहिती देणे किंवा विरोध न करणे या गोष्टी संमती दर्शवत नाहीत. तसेच, पीडित आघाताला वेगवेगळ्या प्रकारे प्रतिसाद देऊ शकतात आणि म्हणून, पीडितांच्या वागण्याच्या साचेबध्द अपेक्षांवर आधारित प्रतिकूल अनुमाने काढणे न्यायालयांनी टाळले पाहिजे.

*कैनी राजन वि. केरळ राज्य*[39] या प्रकरणामध्ये, मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की संमती ही ऐच्छिक आणि असंदिग्ध असली पाहिजे.

## ४. लिंगभाव-विरहित, पीडित-केंद्री संज्ञा

भाषा सन्मानजनक आणि सर्वसमावेशक असली पाहिजे आणि त्यातून लिंगभावविषयक साचेबध्द धारणांना पाठबळ देणे टाळले पाहिजे. पीडित-केंद्री शब्दावली सर्व बाधित व्यक्तींच्या अनुभवांना मान्यता देते.

---

37. (१९९६) २ एस.सी.सी. ३८४.

38. (१९९५) ६ एस.सी.सी. १९४.

39. (२०१३) ९ एस.सी.सी. ११३.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण वि. भारतीय संघराज्य[40] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने सर्वलिंगी व्यक्तींची प्रतिष्ठा आणि समानता यावर भर दिला.

## ५. १८ वर्षांखालील पीडितांसाठी "बालक" किंवा "अज्ञान"

पोक्सो अधिनियमांतर्गत, १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्ती कायदेशीरदृष्ट्या बालक म्हणून ओळखली जाते. बालकांप्रती संवेदनशील शब्दावली कायद्याची संरक्षक चौकट बळकट बनवते.

*इरा वि. राज्य (राष्ट्रीय राजधानी प्रदेश दिल्ली)*[41] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने पोक्सो अधिनियमाच्या बालक-केंद्रित उद्दिष्टाचा पुनरुच्चार केला.

## ६. "पीडित" किंवा "गुन्ह्यातून बचावलेली व्यक्ती", "फिर्यादी स्त्री" नव्हे

"फिर्यादी स्त्री" ही संज्ञा प्रक्रियात्मक आणि व्यक्तिनिरपेक्ष आहे. "पीडित" किंवा "गुन्ह्यातून बचावलेली व्यक्ती" हे शब्दप्रयोग अधिक संवेदनशील आणि सन्मानजनक आहेत.

*अपर्णा भट वि. मध्य प्रदेश राज्य*[42] या प्रकरणामध्ये, मा. सर्वोच्च न्यायालयाने लिंगभाव-संवेदनक्षम न्यायिक भाषेच्या महत्त्वावर भर दिला.

## ७. भाषा बालकांप्रती संवेदनशील असली पाहिजे

न्यायिक भाषेमध्ये, विशेषतः बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये, सनसनाटी भाषा, नैतिक निरीक्षणे किंवा दूषण देणारे शब्दप्रयोग टाळले पाहिजेत.

*साक्षी वि. भारतीय संघराज्य*[43] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने दुय्यम पीडन टाळण्यासाठी बालकांप्रती संवेदनशील प्रक्रियांवर भर दिला.

## ८. स्वायत्तता, संमती आणि बालकांचे हक्क केंद्रस्थानी असले पाहिजेत

न्यायिक मीमांसेमध्ये नैतिकतेच्या आणि प्रतिष्ठेच्या कल्पनांना प्राधान्य न देता

---

40 (२०१४) ५ एस.सी.सी. ४३८.

41. (२०१७) १५ एस.सी.सी. १३३.

42. उपरोल्लेखित.

43. (२००४) ५ एस.सी.सी. ५१८.

शारीरिक स्वायत्तता, पूर्वसूचित संमती, प्रतिष्ठा आणि बालकाचे सर्वोत्तम हित यांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. *सुचिता श्रीवास्तव वि. चंदीगढ प्रशासन*[44] या प्रकरणामध्ये, मा. सर्वोच्च न्यायालयाने वैयक्तिक स्वायत्तता ही कलम २१ चा भाग असल्याचे म्हटले आहे.

## ९. मानसिक आणि शारीरिक आघात ओळखणे

लैंगिक अपराधांचे परिणाम शारीरिक इजेबरोबरच दीर्घकालीन भावनिक आणि मानसिक आघातदेखील असू शकतात. पुराव्याचे मूल्यांकन करताना आणि पिडीताच्या वर्तनाचे मूल्यमापन करताना न्यायालयाने आघाताची जाणीव असणारा दृष्टिकोन अवलंबला पाहिजे.

*कर्नाटक राज्य वि. कृष्णप्पा*[45] या प्रकरणात, मा. सर्वोच्च न्यायालयाने बलात्कार म्हणजे मानवी प्रतिष्ठेचे आणि हक्कांचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे.

---

44. (२००९) ९ एस.सी.सी. १.

45. (२०००) ४ एस.सी.सी. ७५.

## टाळावयाचे शब्दप्रयोग

### १. पीडितेला - दोषी ठरवण्याचे सर्व प्रकार

पीडितेला - दोषी ठरवणे हा बलात्काराच्या **संस्कृतीचा** एक भाग आहे, जिथे पीडितेची वर्तणूक, जीवनशैली, पेहराव आणि तक्रार करण्यास केलेल्या विलंबावर आणि तिच्या पुर्वायुष्यातील नातेसंबंधांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून संपूर्ण जबाबदारी पीडितेवर ढकलली जाते.

पंजाब राज्य विरुद्ध गुरमित सिंग[46] या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक रूढीवादी विचारांच्या आधारे पीडितांवर संशय व्यक्त करण्याबाबत ताकीद दिली आहे.

### २. "लाजाळूपणा," "सन्मान" किंवा "पावित्र्य" यांसारखे शब्दप्रयोग

यासारखे शब्द पुरुषप्रधान विचारांमध्ये खोलवर रुजलेले आहेत, जे स्त्रीचे मूल्य तिच्या लैंगिक शुद्धतेशी किंवा कौटुंबिक प्रतिष्ठेशी जोडतात. त्याऐवजी न्यायालयांनी प्रतिष्ठा, स्वायत्तता आणि घटनात्मक अधिकारांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

अपर्णा भट विरुद्ध मध्य प्रदेश राज्य[47] या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयांना न्यायालयीन आदेशांमध्ये लिंगभेदी आणि अनुचित निरीक्षणे टाळण्याचे निर्देश दिले आहेत.

### ३. "असहाय्य स्त्री" सारखे शब्दप्रयोग

महिला कमकुवत, परावलंबी किंवा कर्तृत्वहीन नसतात, अशा प्रकारची अभिव्यक्ती लिंगभेदी मानसिकता प्रतिबिंबित करतात. न्यायालयाने महिलांकडे समानता आणि सन्मानासह अधिकार धारण करणारी व्यक्ती म्हणून पाहिले

46. उपरोल्लेखित.

47. उपरोल्लेखित.

पाहिजे.

जोसेफ शाइन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया[48] या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने संविधानांतर्गत महिलांचा सन्मान, स्वायत्तता आणि समान दर्जा यावर भर दिला आहे.

## ४. तक्रारदारांबद्दल सामान्यीकरण

न्यायालयांनी असे गृहीत धरू नये की महिला किंवा पीडित आघातानंतर एकसमान पद्धतीने वागतात. लैंगिक हिंसाचाराबद्दल प्रतिक्रिया व्यक्तिपरत्वे भिन्न असतात. न्यायालयीन निष्कर्ष हे वैयक्तिक आणि पुराव्यावर आधारित असणे आवश्यक आहे.

भारवडा भोगीनभाई हिरजीभाई विरुद्ध गुजरात राज्य[49] या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने लैंगिक अत्याचाराच्या पीडितांच्या वर्तणुकीसंदर्भातील रूढिवादी समज फेटाळून लावले आणि लैंगिक हिंसाचाराची तक्रार करण्याच्या संबंधाने लागणारा सामाजिक कलंक ओळखून, पीडितांच्या साक्षीला पुष्टीकरणाची आवश्यकता नाही हे स्पष्ट केले.

## ५. मान / लज्जा आणि पातिव्रत्याच्या रूढिवादी कल्पना

असे शब्द भेदभावपूर्ण वृत्ती दर्शवतात आणि हिंसाचाराला कुटुंबाच्या प्रतिष्ठेवरील हल्ला मानतात. न्यायालयांनी संमती आणि अधिकारांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

महाराष्ट्र राज्य विरुद्ध मधुकर नारायण मार्डीकर[50] या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, स्त्रीच्या कथित लैंगिक आचरणाच्या आधारे तिचे मूल्यमापन केले गेले तरी, तिलाही गोपनीयता आणि प्रतिष्ठेचा अधिकार

48. उपरोल्लेखित.
49. (१९८३) ३ एससीसी २१७
50. (१९९१) १ एससीसी ५७

आहे.

### ६. महिला किंवा कुटुंबांकडून अतिशयोक्ती केल्याची गृहितके

आरोप केवळ लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित आहेत म्हणून आरोप बनावट किंवा अतिशयोक्तीपूर्ण आहेत असे न्यायालयांनी गृहीत धरू नये. अशा गृहितकांमुळे पीडित आणि कुटुंबियांबद्दल अविश्वास कायम राहतो.

हिमाचल प्रदेश राज्य विरुद्ध रघुबीर सिंग[51] या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की किरकोळ विसंगतींमुळे पीडितेच्या साक्षीतील महत्वाच्या बाबींवर परिणाम होऊ नये.

### ७. पूर्वग्रहदूषित किंवा लैंगिक स्वरूपाचे वर्णन

न्यायालयीन भाषा तटस्थ आणि व्यावसायिक असली पाहिजे आणि त्यात बाह्य स्वरूप, जीवनशैली किंवा लैंगिक पुर्वायुष्याबद्दल अनावश्यक टिप्पण्या असू नयेत.

विशाखा विरुद्ध राजस्थान राज्य[52] या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी आणि सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यावर आणि लैंगिक समानतेवर भर दिला आहे.

### ८. "वासना" सारखे शब्दप्रयोग

असे शब्द केवळ पुरुषांच्या अनियंत्रित इच्छेला नैसर्गिक घटना म्हणून दर्शवित नाहीत, तर अप्रत्यक्षपणे स्वीकारतात आणि त्याचबरोबर त्या कृत्यांना कमकुवतही करतात. त्याऐवजी न्यायालयांनी "लैंगिक अत्याचार", "लैंगिक हिंसा" किंवा "गुन्हा" यांसारख्या कायदेशीरदृष्ट्या अचूक शब्दांचा वापर केला पाहिजे.

---

51. (१९९३) २ एससीसी ६२२

52. उपरोल्लेखित.

कर्नाटक राज्य विरुद्ध कृष्णप्पा[53] या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने बलात्कार हा केवळ क्षणिक आवेगातून केलेला गुन्हा न मानता, प्रतिष्ठा आणि मूलभूत अधिकारांचे उल्लंघन असल्याचे मान्य केले आहे.

## ९. पक्षपाती, रूढिवादी किंवा दोषी ठरवणारी भाषा

कोणत्याही न्यायनिर्णयाची भाषा पक्षपात आणि पूर्वग्रहांपासून मुक्त असावी. पीडितेची प्रतिष्ठा जपण्याची काळजी घेतली पाहिजे. वापरली जाणारी भाषा कधीही दोषी ठरवणारी नसावी, त्याऐवजी, ती सक्षमीकरण करणारी असली पाहिजे, कारण सक्षमीकरणासाठी भाषा हे सर्वात महत्त्वाचे साधन आहे.

अपर्णा भट विरुद्ध मध्य प्रदेश राज्य[54] या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीशांना विशेषत: महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये पुरुषसत्ताक रूढीवादी आणि असंवेदनशील निरीक्षणे वापरणे टाळण्याचे विशेष निर्देश दिले आहेत.

### प्रशिक्षण आणि संवेदनशीलता

संवेदनशीलता ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे, जी नियमितपणे शिकली पाहिजे. प्रशिक्षणामुळे पीडित, साक्षीदार आणि सर्व असुरक्षित गटांबद्दल संवेदनशीलता निर्माण होते. एस.पी. गुप्ता विरुद्ध युनियन ऑफ इंडिया[55] या प्रथम न्यायाधीशांच्या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने पीठासीन न्यायाधीशांना स्वत: च्या विचारांपासून स्वतंत्र करण्यासाठी प्रशिक्षणाचा विचार केला होता,

*"परंतु जर न्यायपालिका खरोखरच स्वतंत्र व्हायची असेल, तर त्यासाठी आणखी काहीतरी आवश्यक आहे आणि ते आपण बाहेर नाही, तर खुद्द न्यायाधीशांमध्येच शोधले पाहिजे. न्यायाधीश स्वत: च्या विचारांपासून स्वतंत्र असले पाहिजे. न्यायाधीश देखील एक मानवच असतो,*

53. (२०००) ४ एससीसी ७५.
54. उपरोल्लेखित.
55. १९८१ पुरवणी एससीसी ८७.

*ज्यांच्यामध्ये उत्कटता आणि पूर्वग्रह, आवडी-निवडी, आपुलकी आणि दुर्भावना, द्वेष आणि तिरस्कार आणि भीती आणि बेपर्वाई यांचे मिश्रण असू शकते. एक यशस्वी न्यायाधीश होण्यासाठी या भावनांना आळा घालणे आणि संयमात ठेवणे आवश्यक आहे आणि हे केवळ शिक्षण, प्रशिक्षण, निरंतर सराव आणि नम्रतेची भावना आणि कर्तव्याप्रती समर्पण जोपासण्यानेच शक्य आहे. असे संयम बाजारात विकत घेतले जाऊ शकत नाहीत किंवा लिखित किंवा अलिखित कायद्यांद्वारे मानवी व्यवस्थेत रुजवले जाऊ शकत नाहीत. जर या गोष्टी असतील, तर संविधानाने आणि कायद्यांनी प्रदान केलेल्या संरक्षणात्मक उपाययोजनांपैकी कोणतीही उपाययोजना जरी नाहीशी झाली, तरी न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याला धक्का बसणार नाही. परंतु या सर्व उपाययोजना असूनही न्यायाधीश स्वतंत्र असेलच असे नाही. केवळ न्यायाधीशांचे आंतरिक सामर्थ्यच न्यायपालिकेला वाचवू शकते."*

**<u>जोडपत्र</u> I**

## न्यायालयीन कामकाजाशी संबंधित अभिप्राय प्रश्नांचा अहवाल

**१. न्यायालयांमध्ये कायदेशीर कार्यवाही आणि वकील व न्यायाधीशांनी तुमच्या खटल्यात**

**/ प्रकरणात वापरलेली भाषा तुम्हाला समजते का ?**

**प्रतिसाद:**

- होय: ८६.४%
- नाही: ७.१%
- थोडेसे: (तक्त्यात नमूद केलेले नाही)
- बहुतेक वेळा: (तक्त्यात नमूद केलेले नाही)

मोठ्या संख्येने (८६.४%) प्रतिसादकर्त्यांनी सांगितले की त्यांना न्यायालयातील कायदेशीर कार्यवाही आणि वकील व न्यायाधीशांनी वापरलेली भाषा समजते.

**२. तुमच्या खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायाधीश तुम्हाला सोप्या आणि समजण्यायोग्य**

**भाषेत न्यायालयीन कार्यवाही समजावून सांगतात का ?**

**प्रतिसाद:**

- नेहमीच : ६९.३%
- कधीकधी: २५.७%
- कधीही नाही: (तक्त्यात नमूद केलेले नाही)

बहुतांश प्रतिसादकर्त्यांनी (६९.३%) असे सूचित केले की न्यायाधीश नेहमीच कोर्टाच्या कार्यवाहीचे स्पष्टीकरण सोप्या आणि समजण्यायोग्य भाषेत करतात,

तर २५.७ % सांगितले की असे कधीकधी घडते.

**३. न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान न्यायाधीश आणि वकील तुमच्याबद्दल संवेदनशील**

**आणि सहानुभूतीशील असतात का ?**

**प्रतिसाद:**

- नेहमीच : ५९.३ %
- कधीही नाही: ९.३ %
- बहुतेक वेळा : २३.६ %
- काही वेळा: ७.९ %

बहुसंख्य (५९.३ %) लोकांना असे वाटते की न्यायाधीश आणि वकील नेहमीच संवेदनशील आणि सहानुभूतीशील असतात, तर २३.६ % लोक असे वर्तन 'बहुतेक वेळा' अनुभवल्याचे सांगतात.

**४. तुम्हाला असे वाटते का की न्यायाधीश तुमचे म्हणणे ऐकत आहेत ?**

**प्रतिसाद:**

- नेहमीच : ६६.४ %
- कधीही नाही: (नमूद केलेले नाही)
- बहुतेक वेळा: २५.७ %
- काही वेळा: (नमूद केलेले नाही)

६६.४ % प्रतिसादकर्त्यांना असे वाटते की न्यायाधीश नेहमीच त्यांचे म्हणणे ऐकून घेतात आणि २५.७ % लोकांना असे वाटते की त्यांचे म्हणणे बहुतेक वेळा ऐकून घेतले जाते.

**५. तुमच्या स्वतः च्या खटल्याच्या अनुभवानुसार, पीठासीन अधिकारी (न्यायाधीश) यांची तुमच्यासोबत असलेली विचारांची देवाणघेवाण आणि संवाद सुधारण्यासाठी काय करता येईल असे तुम्हाला वाटते ?**

- स्पष्ट, सोप्या भाषेचा वापर आणि कायदेशीर परिभाषेचा कमीतकमी वापर.
- पक्षांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी अधिक वेळ मिळावा.
- अधिक पारदर्शकता, खटल्याच्या प्रगतीविषयी नियमित अद्ययावत माहिती आणि सुनावणी तहकूब करण्यासाठी योग्य स्पष्टीकरणे.
- प्रकरणांची, विशेषत: संवेदनशील प्रकरणांची (उदा. भारतीय दंड संहिता कलम ४९८ अ, घरगुती हिंसाचार कायदा) नियमित किंवा यांत्रिक पद्धतीने हाताळणी टाळणे .
- कोणत्याही गैरवर्तनासाठी कठोर उत्तरदायित्व ठरवणे.
- सुधारलेली समन्वयक्षमता आणि संयमाने ऐकण्याची वृत्ती.
- पीडित आणि साक्षीदारांसाठी स्वतंत्र प्रतीक्षा कक्ष.
- शक्य असेल तेथे स्थानिक भाषेत कार्यवाही चालवणे.
- विनम्रता, आदरयुक्त वर्तणूक आणि पोषक वातावरण.

**६. (अ) एक पीडित किंवा साक्षीदार म्हणून न्यायालयात कोणत्याही क्षणी तुम्हाला धाक /**

**भीती वाटते का?**

**प्रतिसाद:**

- होय: १७.१ %
- नाही: ८२.९ %

बहुतांश प्रतिसादकर्त्यांना (८२.९ %) न्यायालयात धाक किंवा भीती वाटत नाही.

**(ब) केव्हा आणि कुठे आणि का ?**

- उलटतपासणी दरम्यान, आक्रमक प्रश्न विचारल्यामुळे किंवा अपरिचित वातावरणामुळे धमकावण्याचा उल्लेख केला गेला.
- काहींना ज्येष्ठ वकिलांकडून किंवा विरोधी पक्षाच्या दबावामुळे धाक वाटला.
- विलंब, वारंवार कामकाज तहकूब करणे आणि गांभीर्याचा अभाव यामुळे देखील नकारात्मक भावना निर्माण झाल्या.
- काही प्रतिसादकर्त्यांना वातावरण पोषक वाटले आणि त्यांना धाक वाटला नाही.

**७. त्या कठीण काळात कोण तुमचे संरक्षण / मदत करू शकेल असे तुम्हाला वाटते ?**

**प्रतिसाद:**

- सरकारी वकील : १२.९ %
- न्यायाधीश : १४.३ %
- बचाव पक्षाचे वकील : ७.९ %
- पोलीस : १२.१ %
- इतर (सरकार / संघटना / संस्था) : ५२.९ %

अर्ध्याहून अधिक लोकांचा असा विश्वास आहे की, (सरकारी वकील, न्यायाधीश, बचाव पक्ष किंवा पोलिस यांच्या व्यतिरिक्त) इतर व्यक्ती किंवा संस्था कठीण काळात सर्वाधिक मदत करतात.

**८. तुम्हाला नवीन कायद्यांतर्गत साक्षीदार संरक्षण योजनेबद्दल माहिती आहे का ? न्यायाधीशांनी तुम्हाला संरक्षणाचा अधिकार, पुनर्वसन, नुकसान भरपाई इत्यादी**

**बाबींचा समावेश असलेल्या या योजनेची माहिती करून दिली आहे का ?**

**प्रतिसाद:**

- होय: १९.३ %
- नाही: ८०.७ %

लक्षणीय बहुसंख्य (८०.७ %) लोकांना साक्षीदार संरक्षण योजनेबद्दल माहिती नाही किंवा न्यायाधीशांनी त्यांना त्याबद्दल माहिती करून दिलेली नाही.

**९. एक पीडित किंवा साक्षीदार म्हणून न्यायालयात तुम्हाला कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे ?**

- अनेक प्रतिसादकर्त्यांनी कोणतीही मोठी आव्हाने नसल्याचे सांगितले.
- सामान्य आव्हानांमध्ये खालील बाबी समाविष्ट आहेत :
  - ✔ वारंवार आणि अनावश्यकपणे कामकाज तहकूब करणे
  - ✔ वकिलांमध्ये गांभीर्य आणि उत्तरदायित्वाचा अभाव
  - ✔ संवाद आणि अद्ययावत माहितीचा अभाव
  - ✔ विलंबामुळे होणारे भावनिक, मानसिक आणि आर्थिक त्रास
  - ✔ पीडित आणि साक्षीदार यांच्यासाठी स्वतंत्र प्रतीक्षालयांचा अभाव
  - ✔ पोलिसांचा आणि विरोधी वकिलांचा दबाव
  - ✔ आघातजन्य घटनेच्या आठवणींमुळे वाटणारी सार्वजनिक लज्जा आणि येणारा तणाव
  - ✔ दीर्घकाळ चालणारे खटले आणि प्रदीर्घ न्यायप्रक्रिया
  - ✔ काहींनी सहाय्यक आणि सहकार्यपूर्ण न्यायालयीन कार्यवाहीचा अनुभव नोंदवला.

**१०. फौजदारी न्याय प्रणाली अधिक मजबूत आणि पीडित / पक्षकारांसाठी अनुकूल बनवण्यासाठी इतर काही सूचना / अभिप्राय आहेत का?**

- ✔ खटल्यांची जलद आणि वेळेवर सुनावणी आणि निपटारा.
- ✔ सुलभ कायदेशीर प्रक्रिया आणि पीडितांसाठी चांगले मार्गदर्शन / मदत.
- ✔ विलंब आणि व्यावसायिक गैरवर्तनाबद्दल अधिक उत्तरदायित्व.
- ✔ स्वतंत्र प्रतीक्षा कक्ष आणि पीडितांचे योग्य संरक्षण.
- ✔ कायदेशीर अधिकार आणि कल्याणकारी योजनांबद्दल अधिक जागरूकता.
- ✔ पोलीस, अभियोग पक्ष आणि न्यायालये यांच्यात सुधारित समन्वय.
- ✔ सर्व संबंधितांकडून मैत्रीपूर्ण, आदरयुक्त वर्तणूक.
- ✔ नियमित कायदेविषयक शिक्षण व जागरूकता कार्यक्रम.
- ✔ प्रत्येक खटला वाजवी मुदतीत निकाली काढला जाईल याची खात्री करणे.
- ✔ काही प्रतिसादकर्ते सध्याच्या प्रणालीवर समाधानी आहेत आणि त्यांनी कोणत्याही सूचना दिल्या नाहीत.

न्यायालयीन कामकाजावरील अभिप्राय सूचित करतो की बहुतेक लोक न्याय प्रणालीकडे सकारात्मक दृष्टीने पाहतात. मोठ्या संख्येने (८६.४ %) लोकांना कायदेशीर प्रक्रिया समजते, ६६.४ % लोकांना न्यायाधीश त्यांचे म्हणणे ऐकून घेतात असे वाटते आणि ६९.३ % लोकांना न्यायाधीशांसोबतचा संवाद स्पष्ट वाटतो. अर्ध्याहून अधिक लोकांचा असा विश्वास आहे की न्यायाधीश आणि वकील सहानुभूतीशील आहेत आणि अनेक जणांना न्यायालयात धाक वाटत नाही. तथापि, काही लक्षणीय समस्या आहेत, विशेषत: पीडितांसाठी जागरूकता आणि त्यांना मिळणारी मदत याबाबतीत - ८०.७ % लोक साक्षीदार संरक्षण योजनेबद्दल अनभिज्ञ आहेत आणि अनेक लोक विलंब,

सुनावणी तहकूब करणे, अकार्यक्षम संवाद आणि भावनिक तणावाचा अनुभव घेतल्याचे सांगतात. प्रतिसादकर्त्यांनी कायदेशीर भाषा सुलभ करणे, खटल्यांच्या सुनावणीचा वेग वाढवणे, न्यायालयीन पारदर्शकता वाढवणे आणि संस्थात्मक जबाबदारी सुनिश्चित करणे अशा सूचना दिल्या आहेत. एकंदरीत, ही प्रणाली सुलभ  आणि आदरपूर्ण असली तरी, तिची कार्यक्षमता, पीडितांचे संरक्षण आणि कार्यपद्धतीतील संवेदनशीलता सुधारण्यासाठी तिच्यात सुधारणा करणे आवश्यक आहे, जेणेकरून ती अधिक प्रभावी आणि वापरकर्त्यांसाठी अनुकूल होईल.

<u>जोडपत्र</u> **II**

# पीडित नुकसान भरपाई योजना, २०१८

सर्वांसाठी न्यायाची उपलब्धता

[लोगो]

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकारणाची

<u>लैंगिक अत्याचारांतील व अन्य गुन्ह्यातील बचावलेल्या / पीडित महिलांसाठी</u>

<u>नुकसानभरपाई योजना - २०१८</u>

**राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण**

१२/११, जामनगर हाऊस, शाहजहान रोड, नवी दिल्ली

वेबसाईट : **www.nalsa.gov.in**

ई-मेल : **nalsa-dla@nic.in**

**<u>पार्श्वभूमी</u>**

भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (फौज.) क्र. ५६५/२०१२ -निपुण सक्सेना आणि इतर विरुद्ध भारत सरकार या प्रकरणात असे मत व्यक्त केले की, "लैंगिक अपराधांच्या आणि असिड हल्ल्यामधील पीडितांसाठी नुकसानभरपाईसंबंधी आदर्श नियम तयार करू शकतील आणि त्यासंदर्भात विद्वान न्यायालयीन मित्र यांनी केलेल्या सूचनांचा विचार करू शकतील, अशा सुमारे ४ किंवा ५ व्यक्तींची समिती राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाने स्थापन करणे उचित ठरेल. विद्वान न्यायालयीन मित्र तसेच विद्वान सॉलिसिटर जनरल यांनी आवश्यकतेनुसार समितीस जेव्हा लागेल तेव्हा सहाय्य करण्याची तयारी दर्शविली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा किंवा त्यांच्या नामनिर्देशित व्यक्ती समितीमध्ये समाविष्ट असावी."

वरील बाबी लक्षात घेता, आदर्श योजना तयार करण्यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाने खालील सदस्यांची समिती गठित केली आहे:-

कु. पिंकी आनंद
अतिरिक्त सॉलिसिटर जनरल

श्री राकेश श्रीवास्तव
सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय,
भारत सरकार

श्री. टी. व्ही. एस. एन. प्रसाद
अतिरिक्त सचिव, गृह मंत्रालय,
भारत सरकार

कु. इंदिरा जयसिंग

ज्येष्ठ अधिवक्ता, भारताचे सर्वोच्च न्यायालय

श्री आलोक अग्रवाल

सदस्य सचिव, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण

श्री सुरिंदर एस. राठी

संचालक, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण

कु. अंजू राठी राणा

सहसचिव,

विधी कार्य विभाग,

विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार

श्री के. एल. शर्मा

सहसचिव,

राष्ट्रीय महिला आयोग

कु. भारती अली

सह-संचालक,

एच. ए. क्यु. : बाल हक्क केंद्र

---

या समितीने अनेक बैठका घेतल्या आणि विद्यमान पीडित नुकसानभरपाई योजनेअंतर्गत लैंगिक अत्याचाराच्या पीडितांसाठी स्वतंत्र "प्रकरण" (Chapter) किंवा "उप-योजना" (Sub-Scheme) तयार करण्याचे निश्चित करण्यात आले.

समितीने पीडित नुकसानभरपाई योजनेचा भाग-II तयार केला आणि त्या मसुद्याबाबत विविध हितसंबंधितांकडून सूचना / अभिप्राय मागविण्यात आले. प्राप्त झालेल्या सूचना / अभिप्रायांचा विचार करून समितीने "**लैंगिक अत्याचारांतील व अन्य गुन्ह्यातील बचावलेल्या / पीडित महिलांसाठी नुकसानभरपाई योजना**" अंतिम केली आणि ती दिनांक २४.०४.२०१८ रोजी भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयासमोर सादर केली.

दिनांक १०.०५.२०१८ रोजी माननीय खंडपीठासमोर निवेदने करण्यात आली तसेच इतर हितसंबंधितांचे म्हणणेही ऐकून घेण्यात आले. सुनावणीदरम्यान प्राप्त झालेल्या अतिरिक्त सूचनांचाही समावेश करण्यात आला आणि अंतिम योजना दिनांक ११.०५.२०१८ रोजी भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करण्यात आली. त्या दिवशी, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि विद्वान न्यायालयीन मित्र (Amicus Curiae) यांचे म्हणणे ऐकल्यानंतर, माननीय खंडपीठाने सदर योजना स्वीकारण्यास मान्यता दिली आणि सर्व राज्य सरकारे / केंद्रशासित प्रदेश प्रशासनांना त्यांच्या संबंधित राज्ये / केंद्रशासित प्रदेशांमध्ये सदर योजनेची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने पुढे असे निरीक्षण नोंदविले की, या योजनेतील कोणतीही बाब वगळली जाऊ नये; तथापि, या योजनेमध्ये भर घालण्यास राज्य सरकारे / केंद्रशासित प्रदेश प्रशासनांना प्रतिबंध नाही.

(सुरिंदर एस. राठी)

संचालक,

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण.

भाग-**II**

या भागामध्ये समाविष्ट असलेल्या प्रकरणास “**लैंगिक अत्याचारांतील व अन्य गुन्ह्यातील बचावलेल्या / पीडित महिलांसाठी नुकसानभरपाई योजना**” असे संबोधण्यात येईल.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | | संक्षिप्त शीर्षक व प्रारंभ | ७० |
| २. | | व्याख्या | ७०-७३ |
| ३. | | महिला पीडित नुकसानभरपाई निधी | ७३-७४ |
| ४. | | नुकसानभरपाईसाठी पात्रता | ७५ |
| ५. | | राज्य विधी सेवा प्राधिकरण किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणासमोर अर्ज करण्याची प्रक्रिया | ७५-७६ |
| ६. | | अर्ज दाखल करण्याचे ठिकाण | ७६ |
| ७. | | राज्य किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून मंजूर करण्यात येऊ शकणारी मदत / दिलासा | ७६ |
| ८. | | नुकसानभरपाई मंजूर करताना विचारात घ्यावयाचे घटक | ७७-७८ |
| ९. | | नुकसानभरपाई मंजूर करण्याची प्रक्रिया | ७९-८१ |
| १०. | | अभिलेखावर ठेवावयाचा आदेश | ८१ |
| ११. | | नुकसानभरपाई वितरित करण्याची पद्धत | ८१-८२ |
| १२. | | पीडितेस अंतरिम दिलासा | ८२-८३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| १३. | | पीडितेस किंवा तिच्या अवलंबितास / अवलंबितांना मंजूर केलेली नुकसानभरपाईची वसूली | ८३-८४ |
| १४. | | अवलंबित्व प्रमाणपत्र | ८४ |
| १५. | | अल्पवयीन पीडित | ८४ |
| १६. | | कालमर्यादा | ८५ |
| १७. | | अपील | ८५ |
| १८. | | निरसन व व्यावृत्ती - | ८५-८६ |
| १९. | | गुन्ह्यांतील महिला पीडितांना लागू असलेले अनुसूची | ८७-८९ |
| २०. | | नमुना-१ | ९०-९१ |

१. **संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ :-**

(१) या प्रकरणास, **"लैंगिक अत्याचारांतील व अन्य गुन्ह्यातील बचावलेल्या / पीडित महिलांसाठी नुकसानभरपाई योजना, २०१८"** असे म्हणावे.

(२) हे भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्याप्रमाणे, त्या तारखेपासून अंमलात येईल.

(३) करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या परिणाम स्वरूप ज्यांना हानी, इजा पोहोचलेली आहे अशा ज्यांना पुनर्वसनाची आवश्यकता आहे अशा पीडित आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला (व्यक्तींना) ती लागू होईल.

२. **व्याख्या :-**

(१) या प्रकरणात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर:-

(क) “संहिता" याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), असा आहे; किंवा **“संहिता" याचा अर्थ, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३.**

(ख) **"अवलंबून असणारी व्यक्ती"** यात पती, वडील, आई, आजी-आजोबा, अविवाहित मुलगी आणि संबंधित क्षेत्राच्या उप-विभागीय दंडाधिकारी / पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी / तपासणी अधिकारी यांच्या अहवालाच्या आधारे विधि सेवा प्राधिकरणाने किंवा जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाने पीडितेची अज्ञान बालके असल्याचे निर्धारित केलेल्या किंवा प्रतिज्ञापत्र सादर करून किंवा तिच्या स्वतःच्या चौकशीत पीडितेवर अवलंबून असल्याचा पुरावा सादर करणाऱ्या व्यक्तीचा (व्यक्तींचा) समावेश होतो;

(ग) **"जिल्हा विधि सेवा प्राधिकरण"** याचा अर्थ, विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ (१९८७ चा ३९) याच्या कलम ९ अन्वये जिल्ह्यासाठी घटीत करण्यात आलेले जिल्हा विधि सेवा प्राधिकरण ("जि. वि. से. प्र."), असा आहे;

(घ) **"नमुना"** याचा अर्थ, या प्रकरणास लागू असलेल्या योजनेसोबत जोडलेला नमूना, असा आहे;

(ड) **"निधी"** याचा अर्थ "राज्य निधी" म्हणजेच राज्य पीडित नुकसानभरपाई योजने अंतर्गत गठित केलेला पीडित नुकसानभरपाई निधी, असा होतो.

(च) **"केंद्रीय निधी"** याचा अर्थ, केंद्रीय पीडित नुकसानभरपाई योजना, २०१५ तून प्राप्त झालेले निधी, असा आहे;

(छ) **"पीडित महिला नुकसानभरपाई निधी"** याचा अर्थ, राज्य निधी आणि केंद्रीय निधीतून पीडित महिलांना वितरित करण्यासाठी वेगळा करण्यात आलेला निधी, असा आहे;

[*राज्य पीडित नुकसानभरपाई निधीमध्ये, त्या मोठ्या निधीचा भाग म्हणून स्वतंत्र बँक खाते ठेवले जाईल, ज्यात राज्य पीडित नुकसानभरपाई निधीतून प्राप्त झालेल्या निधी व्यतिरिक्त, केंद्रीय पीडित नुकसानभरपाई निधी योजनेअंतर्गत गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्याद्वारे निर्भया निधीतून देण्यात आलेला निधी, ठेवण्यात येईल. ज्याचा उपयोग फक्त या योजनेअंतर्गत येणाऱ्या पीडितांसाठीच करण्यात येईल.*]

(ज) **"शासन"** याचा अर्थ, जिथे 'राज्य पीडित नुकसानभरपाई योजना' किंवा 'राज्य पीडित नुकसानभरपाई निधी योजना' यांचा संदर्भ

असेल, तिथे 'शासन' म्हणजे 'केंद्र शासन' असा अर्थ होतो आणि त्यात केंद्रशासित प्रदेशांचाही समावेश होतो.

(झ) **"इजा"** याचा अर्थ, स्त्रीच्या शरीरास किंवा मनास केलेली कोणतीही इजा, असा आहे;

(ञ) **"अज्ञान"** याचा अर्थ, जिने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली नाहीत, अशी मुलगी असा होतो;

(ट) **"अपराध"** याचा अर्थ, भारतीय दंड संहिता किंवा **भारतीय न्याय संहिता** इतर कोणत्याही कायद्याअंतर्गत शिक्षेस पात्र असा महिलांविरुद्ध करण्यात आलेला गुन्हा, असा आहे;

(ठ) **"दंड संहिता"** याचा अर्थ, भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) असा आहे; आणि न्याय संहिता याचा अर्थ, **"भारतीय न्याय संहिता, २०२३"** असा आहे;

(ड) **'अनुसूची'** याचा अर्थ, या योजनेच्या प्रकरणास / भागास लागू असलेली अनुसूची, असा होतो;

(ढ) **“राज्य विधि सेवा प्राधिकरण"** याचा अर्थ, विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ (१९८७ चा ३९) याच्या कलम ६ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, राज्य विधि सेवा प्राधिकरण (यात यापुढे ज्याचा निर्देश "राविसेप्र" असा केला आहे), असा आहे;

(ण) **"लैंगिक अत्याचार पीडित"** म्हणजे अशी महिला, जिने भारतीय न्याय संहितेचे कलम ३७६ **(A) ते (E)** किंवा **भारतीय न्याय संहितेचे कलम ६४ (A ते M)**, कलम ३५४ (A) ते (D), किंवा **भारतीय न्याय संहितेचे कलम ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७४, ७५, ७६, ७७, ७८,** भारतीय दंड संहितेचे कलम ५०९ किंवा

**भारतीय न्याय संहितेचे कलम ७९** यांसह कोणत्याही लैंगिक अपराधाचा (गुन्ह्याचा) परिणाम म्हणून मानसिक किंवा शारीरिक इजा (जखम) किंवा दोन्ही सहन केले आहेत;

**(त) "इतर गुन्ह्यातील पीडित / गुन्ह्यातील बचावलेली महिला"** म्हणजे अशी महिला, जिने सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अपराधाचा (गुन्ह्याचा) परिणाम म्हणून शारीरिक किंवा मानसिक इजा सहन केली आहे; ज्यामध्ये **भारतीय न्याय संहितेचे कलम ८०** (किंवा भा.दं.सं.चे कलम ३०४ B), **भारतीय न्याय संहितेचे कलम १२४** (किंवा भा.दं.सं.चे कलम ३२६A), **भारतीय न्याय संहितेचे कलम ८५** (किंवा भा.दं.सं.चे कलम ४९८A) (अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या शारीरिक इजेच्या बाबतीत), तसेच संबंधित गुन्ह्यांचे प्रयत्न आणि अपप्रेरणा यांचा समावेश आहे.

(२) या प्रकरणात वापरलेले आणि येथे व्याख्या न केलेले शब्द आणि अभिव्यक्ती यांना अनुक्रमे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ आणि / किंवा भारतीय दंड संहिता, १८६० किंवा **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ आणि / किंवा भारतीय न्याय संहिता, २०२३** मध्ये जो अर्थ नेमून दिलेला आहे, तोच अर्थ असेल;

३. **पीडित महिलांकरिता नुकसानभरपाई निधी :-**

(१) **"पीडित महिलांकरिता नुकसानभरपाई निधी"** या नावाचा एक निधी स्थापन करण्यात येईल, ज्यामधून राज्य विधि सेवा प्राधिकरणाने किंवा यथास्थिती, जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाने ठरविलेली नुकसानभरपाईची रक्कम एखाद्या अपराधाचा परिणाम म्हणून ज्यांना

हानी किंवा इजा पोचलेली आहे आणि ज्यांच्या पुनर्वसनाची आवश्यकता आहे अशा पीडित महिलांना किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला (व्यक्तींना) देण्यात येईल.

(२) **"पीडित महिलांकरिता नुकसानभरपाई निधी"** मध्ये पुढील बाबींचा मिळून बनलेला असेल,

(क) केंद्रीय पीडित व्यक्तींकरिता नुकसानभरपाई योजना, २०१५ यामधून प्राप्त झालेले अंशदान;

(ख) राज्य विधी सेवा प्राधिकरणाला साहाय्यक अनुदानाच्या रूपाने अर्थसंकल्पीय वाटप, ज्यासाठी शासनाकडून (सरकारकडून) वार्षिक अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद केली जाईल;

(ग) या निधीमध्ये जमा करावयाची दिवाणी / फौजदारी न्यायाधिकरणाने आदेश दिलेली कोणतीही परिव्यय रक्कम;

(घ) योजनेच्या कलम १४ अंतर्गत चुकीचे कृत्य करणाऱ्याकडून / आरोपीकडून वसूल केलेली भरपाईची रक्कम;

(ड) राज्य किंवा केंद्र सरकारने परवानगी दिलेल्या आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / लोकहितकर्ता / धर्मादाय संस्था / संघटना आणि व्यक्ती यांच्याकडून देणग्या व अंशदाने; आणि

(च) कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व या अंतर्गत कंपन्यांकडून मिळणारी अंशदाने;

(३) राज्य विधि सेवा प्राधिकरणाद्वारे (रा. वि. से. प्रा.) उक्त निधीचे कार्यान्वयन करण्यात येईल.

४. **नुकसानभरपाईसाठी पात्रता:-**

पीडित महिला किंवा यथास्थिती, तिच्यावर अवलंबून असणारी (असणाऱ्या) व्यक्ती, तिला लागू असलेल्या बहुविध योजनांतील नुकसानभरपाई मिळण्यासाठी पात्र असतील. तथापि, संहितेच्या कलम ३५७ ख किंवा **भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ३९६** शी संबंधित इतर योजनांतून तिला मिळालेली नुकसानभरपाई ही, नुकसानभरपाईचे प्रमाण ठरविताना विचारात घेण्यात येईल.

५. **राज्य विधि सेवा प्राधिकरणाकडे किंवा जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाकडे अर्ज करण्याकरिता कार्यपद्धती :-**

प्राथमिक अहवाल कळविणे अनिवार्य असणे:- पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी/पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, भारतीय दंड संहितेची कलमे ३२६ क, ३५४ क ते ३५४ घ, ३७६ क ते ३७६ ड, ३०४ ख, ४९८ क किंवा **भारतीय न्याय संहितेचे कलम १२४, ७४, ७५, ७६, ७८, कलम ६३ ते कलम ७२, कलम ८०, ८५** (या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या शारीरिक इजेच्या बाबतीत) अंतर्भूत असलेल्या या योजनेमध्ये समाविष्ट असलेले अपराध केल्याच्या संबंधात प्राथमिक माहिती अहवाल तो नोंदवल्यानंतर तत्काळ, त्याची सॉफ्ट / हार्ड प्रत राज्य विधि सेवा प्राधिकरणास / जिल्हा विधि सेवा प्राधिकरणास अनिवार्यपणे देण्यात येईल, ज्यामुळे राज्य विधि सेवा प्राधिकरणाला / जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाला पात्र प्रकरणामध्ये अंतरिम नुकसानभरपाई मंजूर करण्याच्या प्रयोजनासाठी वस्तुस्थितीची प्रारंभिक पडताळणी स्वाधिकारे सुरू करणे शक्य होईल.

पीडितेस किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींस किंवा त्या क्षेत्राच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास राज्य विधि सेवा प्राधिकरणासमोर / जिल्हा विधि सेवा प्राधिकरणासमोर अंतरिक किंवा अंतिम नुकसानभरपाई प्रदान करण्यासाठीचा अर्ज दाखल करता येऊ शकेल. तो प्रथम माहिती अहवालाची किंवा

न्यायालयाने दखल घेतलेली आहे अशी फौजदारी तक्रारीची प्रत आणि जेथे लागू असेल तेथे, उपलब्ध असल्यास वैद्यकीय अहवाल, मृत्यू प्रमाणपत्र, न्यायचौकशी समाप्त झाली असल्यास, न्यायालयाच्या न्यायनिर्णयाची किंवा शिफारशीची प्रत यांसोबत नमुना **'I'**, मध्ये सादर करील.

६. **अर्ज दाखल करण्याचे ठिकाण.**

नुकसानभरपाईसाठीचा अर्ज / शिफारस, एकतर राज्य विधि सेवा प्राधिकरणासमोर किंवा संबंधित जिल्हा विधि सेवा प्राधिकरणासमोर दाखल करता येईल किंवा तो, सर्व राज्ये विधि सेवा प्राधिकरणांद्वारे निर्माण करण्यात येईल अशा पोर्टलवर ऑनलाईन दाखल करता येईल. संबंधित जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचा सचिव, त्याच्या / तिच्यापुढे दाखल केलेल्या अर्जावर / शिफारशीवर योजनेनुसार निर्णय घेईल.

**स्पष्टीकरण:-** ॲसिड हल्ला पीडितेच्या बाबतीत निर्णय देणारे प्राधिकरण हे, लक्ष्मी विरुद्ध भारताचे संघराज्य (रिट याचिका, फौजदारी, क्र. १२९/२००६, आदेश दिनांक १० एप्रिल २०१५) मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने निदेशित केल्यानुसार फौजदारी इजा नुकसानभरपाई मंडळ असेल, त्यामध्ये विद्वान जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा दंडाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक / जिल्ह्याचा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश आहे.

**७. राज्य विधि सेवा प्राधिकरणाद्वारे किंवा जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाद्वारे देता येईल असे सहाय्य:-**

राज्य विधि सेवा प्राधिकरणास किंवा जिल्हा विधि सेवा प्राधिकरणास, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेत पीडितेस किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना नुकसानभरपाई प्रदान करता येईल.

## ८. नुकसानभरपाई प्रदान करताना विचारात घ्यावयाचे घटक:-

या प्रकरणावर निर्णय देत असताना, राज्य विधि सेवा प्राधिकरण किंवा जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, पीडितेने सोसलेले नुकसान किंवा इजा यांच्याशी संबंधित पुढील घटक विचारात घेईल:-

(१) अपराधाचे गांभीर्य आणि पीडितेने सोसलेली मानसिक किंवा शारीरिक हानी किंवा इजा यांची तीव्रता;

(२) पीडितेचे समुदेशन, अंत्यसंस्कार, अन्वेषण किंवा चौकशी किंवा न्यायचौकशी या दरम्यानचा प्रवास (आहार खर्चा व्यतिरिक्त) यांसह शारीरिक किंवा मानसिक आरोग्यासाठी वैद्यकीय उपचारावर झालेला खर्च किंवा होणारा संभाव्य खर्च;

(३) मानसिक आघात, शारीरिक इजा, वैद्यकीय उपचार, अपराधाचे अन्वेषण व न्यायचौकशी, किंवा इतर कोणतेही कारण यांमुळे शाळा किंवा महाविद्यालयातील अनुपस्थिती यांसह, अपराधाचा परिणाम म्हणून शैक्षणिक संधीचे नुकसान;

(४) मानसिक आघात, शारीरिक इजा, वैद्यकीय उपचार, अपराधाचे अन्वेषण व न्यायचौकशी, किंवा इतर कोणतेही कारण यांमुळे रोजगाराच्या ठिकाणी अनुपस्थिती यांसह, अपराधाचा परिणाम म्हणून रोजगाराचे नुकसान;

(५) बळी पडलेल्या व्यक्तीचा अपराध्याशी संबंध, कोणताही असल्यास;

६) गैरवर्तन ही एक वेगळी घटना आहे किंवा कसे किंवा गैरवर्तन त्या ठिकाणी ठराविक कालावधीत झाले आहे किंवा कसे;

(७) अपराधाचा (बलात्काराचा) परिणाम म्हणून बळी पडलेली व्यक्ती

गरोदर राहिली आहे किंवा कसे, ती वैद्यकीय सगर्भता समापन (एम.टी.पी.) झाली आहे, किंवा कसे अथवा तिने बाळाला जन्म दिला आहे, अशा बाळाच्या पुनर्वसनाच्या आवश्यकता;

(८) अपराधाचा परिणाम म्हणून बळी पडलेली व्यक्ती संभोगजन्य रोगामुळे एस.टी.डी. बाधित झाली आहे किंवा कसे;

(९) अपराधाचा परिणाम म्हणून बळी पडलेली व्यक्ती ह्युमन इम्युनोडिफीसीएन्सी विषाणुमुळे (एच. आय. व्ही) बाधित झाली आहे किंवा कसे;

(१०) अपराधाचा परिणाम म्हणून बळी पडलेल्या व्यक्तीला कोणतीही अक्षमता सहन करावी लागत आहे;

(११) जिच्याविरुद्ध अपराध घडला आहे त्या बळी पडलेल्या व्यक्तीची आर्थिक स्थिती, जेणेकरून बळी पडलेल्या व्यक्तीच्या पुनर्वसन व पुनर्रकीकरणाच्या गरजा निश्चित करता येतील;

(१२) मृत्यू झाला असेल तर, मृत व्यक्तीचे वय, तिचे मासिक उत्पन्न अवलंबून असणाऱ्यांची संख्या, अपेक्षित आयुमर्यादा, भविष्यातील प्रवर्धन / अपेक्षित वाढ, इत्यादी;

(१३) किंवा राज्य विधि सेवा प्राधिकरणास किंवा जिल्हा विधि सेवा प्राधिकरणास न्याय्य व पर्याप्त वाटतील असे इतर कोणतेही घटक.

## ९. नुकसानभरपाई मंजूर करण्याची प्रक्रिया -

(१) जेव्हा भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ३५७अ च्या पोट-कलम (२) आणि/किंवा (३) अन्वये [किंवा सदर संहितेच्या कलम ३९६ च्या पोट-कलम (२) आणि/किंवा (३) अन्वये] न्यायालयाने नुकसान भरपाईसाठी शिफारस केली असेल तर, किंवा सुरक्षा संहितेच्या कलम ३५७अ च्या पोट-कलम (४) अन्वये [किंवा कलम ३९६ च्या पोट-कलम (४) अन्वये] पीडितेने किंवा तिच्यावर अवलंबून असलेली व्यक्ती यांनी राज्य विधी सेवा प्राधिकरण किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे अंतरिम नुकसानभरपाईसाठी अर्ज केला असेल, तेव्हा प्राधिकरणाने प्रथमदर्शनी नुकसान भरपाईची गरज आणि पीडितेची ओळख पटविणे याबद्दल स्वतःचे समाधान करून घेणे आवश्यक राहील. अंतिम नुकसान भरपाईबाबत, प्राधिकरणाने प्रकरणाची तपासणी करावी आणि गुन्ह्यामुळे झालेले नुकसान/इजा तसेच पुनर्वसनाची गरज यासंदर्भातील दाव्यातील तपशिलांची पडताळणी करावी; तसेच, दाव्यामध्ये निर्णय देण्यासाठी आवश्यक असलेली इतर कोणतीही संबंधित माहिती मागवावी.

परंतु अट अशी की, पात्र असलेल्या प्रकरणांमध्ये आणि ॲसिड हल्ला झालेल्या सर्व प्रकरणांमध्ये, गुन्हा घडल्यानंतर कोणत्याही वेळी, राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव स्वतःहून किंवा तथ्यांची प्राथमिक पडताळणी केल्यानंतर, प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार अंतरिम मदत मंजूर करू शकतील.

(२) सुरक्षा संहितेच्या कलम ३५७अ च्या पोट-कलम (५) अन्वये किंवा सुरक्षा संहितेच्या कलम ३९६ अन्वये योजलेली चौकशी वेगाने पूर्ण केली जाईल आणि हा कालावधी कोणत्याही परिस्थितीत दावा/अर्ज किंवा शिफारस प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांपेक्षा जास्त असणार नाही:

परंतु अट अशी की, ॲसिड हल्ल्याच्या प्रकरणांमध्ये पीडितेस, हे प्रकरण जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या निदर्शनास आणल्यापासून १५ दिवसांच्या आत रक्कम

रुपये १ लाख इतकी रक्कम प्रदान केली जाईल. अंतरिम नुकसान भरपाई मंजूर करण्याचा आदेश जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे हे प्रकरण त्यांच्या निदर्शनास आल्यापासून ७ दिवसांच्या आत पारित केला जाईल आणि राज्य विधी सेवा प्राधिकरण हा आदेश पारित झाल्यापासून ८ दिवसांच्या आत नुकसान भरपाईची रक्कम प्रदान करेल. त्यानंतर, रक्कम रुपये २ लाख ही रक्कम पीडितेस शक्य तितक्या लवकर आणि पहिल्या हप्त्याच्या देयकानंतर निश्चितपणे दोन महिन्यांच्या आत दिली जाईल:

परंतु आणखी अशी अट की, पीडितेस या योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली अशी पुढील रक्कम देखील दिली जाऊ शकते.

(३) प्रकरणाचा विचार केल्यानंतर, राज्य विधी सेवा प्राधिकरण किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यथास्थिती, यांचे समाधान झाल्यानंतर, या प्रकरणासोबत जोडलेल्या अनुसूचीनुसार योजनेच्या खंड ८ मध्ये नमूद केलेल्या बाबींचा विचार करून पीडितेला किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीला द्यावयाच्या भरपाईच्या रक्कमेचे प्रमाण निश्चित करेल. तथापि, पात्र प्रकरणांमध्ये, कारणांची नोंद करून नुकसान भरपाईची कमाल मर्यादा ओलांडली जाऊ शकते.

तसेच, पीडिता अल्पवयीन असल्याच्या प्रकरणामध्ये, नुकसान भरपाईची मर्यादा या प्रकरणासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या रक्कमेपेक्षा ५०% अधिक असल्याचे मानले जाईल.

** ॲसिड हल्ल्यातील पीडिता ही गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या ज्ञापन क्र. 24013/ 94/ Misc/2014-CSR-III/GoI/MHA दिनांक ०९.११.२०१६ अन्वये 'प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधी' अंतर्गत रक्कम रुपये १ लाखाच्या अतिरिक्त भरपाईसाठी देखील पात्र आहे.*

*केंद्रीय पीडित भरपाई निधी मार्गदर्शक तत्त्वे-२०१६, क्र. 24013/ 94/ Misc/ 2014-CSR.III. MHA GoI नुसार संबंधित राज्य/केंद्रशासित प्रदेश यांद्वारे दिलेल्या नुकसान भरपाईव्यतिरिक्त उपचारासाठी खर्च आवश्यक असणाऱ्या ॲसिड हल्ल्यातील पीडिता रक्कम रुपये ५ लाखांपर्यंतच्या अतिरिक्त विशेष आर्थिक सहाय्यासाठी देखील पात्र आहे.*

(४) योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी राज्य विधी सेवा प्राधिकरण / जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे कोणतेही अभिलेख मागवू शकतात किंवा कोणतेही संबंधित प्राधिकरण, आस्थापना, व्यक्ती, पोलीस, न्यायालय किंवा तज्ज्ञांचे सहाय्य घेऊ शकतात.

(५) जर न्यायचौकशी/अपिलीय न्यायालयाने असा निष्कर्ष काढला की फौजदारी तक्रार आणि आरोप हे खोटे होते, तर विधी सेवा प्राधिकरण हे या योजनेअंतर्गत अंशतः किंवा पूर्णपणे मंजूर केलेल्या नुकसान भरपाईची (मंजूर केली असल्यास) वसुली करण्यासाठी न्यायचौकशी न्यायालयासमोर जणू काही ती दंडाची रक्कम आहे, अशा प्रकारे वसुलीची कारवाई सुरू करू शकते.

## १०. अभिलेखावर ठेवण्यात येणारा आदेश -

या योजनेअंतर्गत पारित केलेल्या अंतरिम किंवा अंतिम नुकसान भरपाईच्या आदेशाची प्रत न्यायचौकशी न्यायालयाच्या अभिलेखावर ठेवली जाईल, जेणेकरून न्यायचौकशी न्यायालयाला सुरक्षा संहितेच्या कलम ३५७ किंवा कलम ३९६ अन्वये नुकसान भरपाईचा योग्य तो आदेश पारित करणे शक्य होईल. जर प्रकरण तपासाधीन असेल, तर आदेशाची प्रमाणित सत्य प्रत तपास अधिकाऱ्याला आणि पीडितेला /तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीला यथास्थिती, पुरविली जाईल.

## ११. नुकसान भरपाई वितरण करण्याची पद्धत -

(१) अशा प्रकारे मंजूर झालेली नुकसान भरपाईची रक्कम राज्य विधी सेवा प्राधिकरणाद्वारे पीडितेच्या अथवा तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीच्या संयुक्त किंवा वैयक्तिक नावाने बँकेत जमा करून वितरित केली जाईल. पीडितेचे कोणतेही बँक खाते नसल्यास, संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पीडितेच्या नावाने बँक खाते उघडण्यास मदत करेल. पीडिता अल्पवयीन असल्यास, पालकांसह किंवा ती बाल संगोपन संस्थेत असल्यास, संस्थेचे अधीक्षक हे पालक म्हणून त्यांच्या संयुक्त नावाने बँक खाते उघडले जाईल. तथापि, पीडिता परदेशी नागरिक किंवा निर्वासित असल्यास,

नुकसान भरपाईची रक्कम कॅश कार्डद्वारे वितरित केली जाऊ शकते.

अंतरिम रक्कम पूर्णपणे वितरित केली जाईल. तथापि, अंतिम नुकसान भरपाईच्या रक्कमेच्या संदर्भात, एकूण रक्कमेपैकी ७५% रक्कम किमान तीन वर्षांच्या कालावधीसाठी मुदत ठेव म्हणून ठेवली जाईल आणि उर्वरित २५% रक्कम पीडितेस / तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीस यथास्थिती, वापरासाठी आणि सुरुवातीच्या खर्चासाठी उपलब्ध केली जाईल.

(२) अल्पवयीन पीडितेच्या बाबतीत, मंजूर करण्यात आलेल्या नुकसान भरपाईच्या रक्कमेपैकी ८०% रक्कम मुदत ठेव खात्यात जमा केली जाईल आणि ती रक्कम पीडिता वयाची १८ वर्षे पूर्ण (सज्ञान) झाल्यानंतरच काढता येईल; मात्र सदर रक्कम मुदत ठेवी मध्ये ठेवल्यापासून ३ वर्षांच्या आत काढता येणार नाही.

परंतु अट अशी की, अपवादात्मक प्रकरणांमध्ये, लाभार्थ्यांच्या शैक्षणिक, वैद्यकीय किंवा इतर अत्यावश्यक आणि तातडीच्या गरजांसाठी राज्य विधी सेवा प्राधिकरण/ जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या स्वेच्छानिर्णयानुसार रक्कम काढली जाऊ शकते.

(३) मुदत ठेव स्वरूपात असलेल्या रक्कमेवरील व्याज बँकेद्वारे थेट पीडितेच्या / तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीच्या बचत खात्यात दरमहा जमा केले जाईल, जे लाभार्थ्याला काढता येईल.

## १२. पीडितेला अंतरिम दिलासा -

पीडितेला होणारा त्रास कमी करण्यासाठी, संबंधित क्षेत्रातील पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या किंवा दंडाधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रावरून किंवा पीडिता / तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीच्या अर्जावरून, किंवा स्वतःहून, राज्य विधी सेवा प्राधिकरण किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यथास्थिती, हे मोफत प्रथमोपचार सुविधा किंवा वैद्यकीय लाभ किंवा

त्यांना योग्य वाटेल अशी कोणतीही इतर अंतरिम मदत (अंतरिम आर्थिक नुकसान भरपाईसह) तात्काळ उपलब्ध करून देण्याचा आदेश देऊ शकतात.

परंतु अट अशी की, नुकसान भरपाईचा अर्ज राज्य विधी सेवा प्राधिकरणाला / जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला प्राप्त होताच, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांच्याद्वारे पीडितेस रक्कम रुपये ५,०००/- किंवा प्रकरणाच्या गरजेनुसार ररक्कम  रुपये १०,०००/- पर्यंतची रक्कम एका राष्ट्रीयकृत बँकेच्या प्रीलोडेड कॅश कार्डद्वारे तात्काळ वितरित केली जाईल.

परंतु अट अशी की, अशा प्रकारे मंजूर केलेली अंतरिम मदत या प्रकरणाला लागू असलेल्या अनुसूचीनुसार कमाल देय नुकसान भरपाई रकमेच्या २५ टक्क्यापेक्षा कमी नसेल आणि ती पीडितेला पूर्णपणे दिली जाईल.

परंतु आणखी अशी अट की, ॲसिड हल्ल्याच्या प्रकरणांमध्ये, सदर प्रकरण राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या / जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या निदर्शनास आणल्यापासून १५ दिवसांच्या आत पीडितेस रक्कम रुपये १ लाख इतकी रक्कम प्रदान केली जाईल. राज्य विधी सेवा प्राधिकरण/ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचेद्वारे अंतरिम नुकसान भरपाई मंजूर करण्याचा आदेश हे प्रकरण त्यांच्या निदर्शनास आल्यापासून ७ दिवसांच्या आत पारित केला जाईल आणि राज्य विधी सेवा प्राधिकरण हा आदेश पारित झाल्यापासून ८ दिवसांच्या आत नुकसान भरपाईची रक्कम देईल. त्यानंतर, रक्कम रुपये २ लाखांची अतिरिक्त रक्कम पीडितेस मंजूर करून शक्य तितक्या लवकर आणि निश्चितपणे दोन महिन्यांच्या आत दिली जाईल.

## १३. पीडितेला किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीला  दिलेल्या नुकसान भरपाईची वसुली -

सुरक्षा संहितेच्या कलम ३५७अ च्या पोट-कलम (३) किंवा कलम ३९६ च्या पोट-कलम

(३) च्या तरतुदींच्या अधीन राहून, राज्य विधी सेवा प्राधिकरण योग्य प्रकरणांमध्ये, पीडितेला किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीला दिलेली नुकसान भरपाई गुन्ह्यामुळे झालेले नुकसान किंवा इजा करण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून (व्यक्तींकडून) वसूल करण्यासाठी सक्षम न्यायालयात कारवाई सुरू करू शकते.

अशा प्रकारे वसूल केलेली रक्कम ही महिला पीडित नुकसान भरपाई निधी मध्ये जमा केली जाईल.

## १४. अवलंबित्व प्रमाणपत्र -

अवलंबित्व प्रमाणपत्र जारी करण्यासाठी शक्ती प्रदान करण्यात आलेले प्राधिकरण १५ दिवसांच्या कालावधीत सदर प्रमाणपत्र जारी करेल आणि कोणत्याही परिस्थितीत ही मुदत वाढवली जाणार नाही:

परंतु अट अशी की, १५ दिवसांची मुदत संपल्यानंतरही अवलंबित्व प्रमाणपत्र जारी न झाल्यास, राज्य विधी सेवा प्राधिकरण / जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे दावेदाराकडून शपथपत्र घेऊन पुढील कारवाई करू शकते.

## १५. अल्पवयीन पीडिता -

पीडिता ही आई-वडील किंवा कायदेशीर पालक नसलेली अनाथ अल्पवयीन पीडिता असल्यास, तातडीची मदत किंवा अंतरिम नुकसान भरपाई ही, ती पीडिता जेथे राहत आहे त्या बाल संगोपन संस्थेच्या अधीक्षकांच्या पालकत्वाखाली उघडलेल्या त्या पीडितेच्या बँक खात्यात वितरित केली जाईल, किंवा अशी संस्था नसल्यास उपविभागीय दंडाधिकारी / डीडीओ यथास्थिती, यांच्या पालकत्वाखालील बँक खात्यात जमा केली जाईल.

## १६. कालमर्यादा -

या योजनेअंतर्गत, सुरक्षा संहितेच्या कलम ३५७अ च्या पोट-कलम (४) किंवा कलम ३९६ च्या पोट-कलम (४) अन्वये पीडितेने किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीने केलेला कोणताही दावा, गुन्हा घडल्याच्या किंवा सुनावणी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतर विचारात घेतला जाणार नाही.

तथापि, पात्र प्रकरणांमध्ये, या संदर्भात केलेल्या अर्जावरून आणि योग्य कारणे नोंदवून, ३ वर्षांनंतर झालेला विलंब राज्य विधी सेवा प्राधिकरण / जिल्हा विधी सेवा प्राधिकरण द्वारे क्षमापित केला जाऊ शकतो.

## १७. अपील -

पीडिता किंवा तिच्यावर अवलंबून असलेली व्यक्ती जर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिवांनी मंजूर केलेल्या नुकसान भरपाईच्या रक्कमेवर समाधानी नसतील, तर ते आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडे अपील दाखल करू शकतात.

परंतु अट अशी की, पात्र प्रकरणांमध्ये, या संदर्भात केलेल्या अर्जावरून आणि योग्य कारणे नोंदवून, अपील प्राधिकरणाद्वारे अपील दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित केला जाऊ शकतो.

## १८. निरसन व व्यावृत्ती -

(१) या प्रकरणात महिलांच्या पीडित नुकसान भरपाईशी संबंधित कोणत्याही मुद्द्याबाबत स्पष्ट उल्लेख नसल्यास, संबंधित राज्याच्या पीडित भरपाई योजनेच्या तरतुदी लागू राहतील.

(२) या योजनेतील कोणतीही बाब/तरतूद पीडितेला किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्या

व्यक्तीला गुन्ह्यातील गुन्हेगाराविरुद्ध किंवा त्यासाठी अप्रत्यक्षपणे जबाबदार असलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीविरुद्ध कोणताही दिवाणी दावा किंवा भरपाईचा अर्ज दाखल करण्यापासून रोखणार नाही.

**स्पष्टीकरण:** हे स्पष्ट करण्यात येत आहे की, पोक्सो कायदा, २०१२ अंतर्गत येणाऱ्या अल्पवयीन पीडितांच्या बाबतीत हे प्रकरण लागू होत नाही; कारण त्यांच्या नुकसान भरपाईचे मुद्दे केवळ पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ३३ (८) आणि पोक्सो नियम, २०१२ च्या नियम (७) अन्वये विद्वान विशेष न्यायालयांद्वारेच हाताळले जातील.

# गुन्ह्यांतील पीडित महिलांना लागू असणारी अनुसूची

| अनुक्रमांक | नुकसानीचा किंवा दुखापतीचा | नुकसानभरपाईची किमान मर्यादा | नुकसानभरपाईची कमाल मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | जीवितहानी | रुपये ५ लाख | रुपये १० लाख |
| २ | सामूहिक बलात्कार | रुपये ५ लाख | रुपये १० लाख |
| ३ | बलात्कार | रुपये ४ लाख | रुपये ७ लाख |
| ४ | अनैसर्गिक लैंगिक अत्याचार | रुपये ४ लाख | रुपये ७ लाख |
| ५ | शरीराचा कोणताही अवयव किंवा भाग गमावल्यामुळे किंवा निकामी झाल्यामुळे ८०% किंवा त्यापेक्षा जास्त कायमस्वरूपी शारीरिक व्यंग आल्यास | रुपये २ लाख | रुपये ५ लाख |
| ६ | शरीराचा कोणताही अवयव किंवा भाग गमावल्यामुळे किंवा निकामी झाल्यामुळे ४० टक्क्यांहून अधिक व ८० टक्क्यांहून कमी कायमस्वरूपी शारीरिक व्यंग आल्यास | रुपये २ लाख | रुपये ४ लाख |
| ७ | शरीराचा कोणताही अवयव किंवा भाग गमावल्यामुळे किंवा निकामी झाल्यामुळे २० टक्क्यांहून अधिक व ४० टक्क्यांहून कमी कायमस्वरूपी शारीरिक व्यंग आल्यास | रुपये १ लाख | रुपये ३ लाख |
| ८ | शरीराचा कोणताही अवयव किंवा भाग गमावल्यामुळे किंवा निकामी | रुपये १ लाख | रुपये २ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| | झाल्यामुळे २० टक्क्यांहून कमी कायमस्वरूपी शारीरिक व्यंग आल्यास | | |
| ९ | गंभीर शारीरिक दुखापत किंवा पुनर्वसनाची गरज असणारी कोणतीही मानसिक इजा | रुपये १ लाख | रुपये २ लाख |
| १० | हल्ल्याच्या परिणामी झालेला गर्भपात किंवा कायमची जननक्षमता नष्ट होणे. | रुपये २ लाख | रुपये ३ लाख |
| ११ | बलात्कारामुळे झालेली गर्भधारणा | रुपये ३ लाख | रुपये ४ लाख |
| १२ | भाजल्यामुळे किंवा आगीमुळे झालेली गंभीर दुखापत | | |
| (a) | चेहरा विद्रुप झाला असल्यास | रुपये ७ लाख | रुपये ८ लाख |
| (b) | दुखापतीचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक असल्यास | रुपये ५ लाख | रुपये ८ लाख |
| (c) | दुखापतीचे प्रमाण ५० टक्क्यांहून कमी असल्यास | रुपये ३ लाख | रुपये ७ लाख |
| (d) | दुखापतीचे प्रमाण २० टक्क्यांहून कमी असल्यास | रुपये २ लाख | रुपये ३ लाख |
| १३ | ॲसिड हल्ल्यातील पीडिता | | |
| (a) | चेहरा विद्रुप झाला असल्यास | रुपये ७ लाख | रुपये ८ लाख |
| (b) | दुखापतीचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक असल्यास | रुपये ५ लाख | रुपये ८ लाख |
| (c) | दुखापतीचे प्रमाण ५० टक्क्यांहून कमी असल्यास | रुपये ३ लाख | रुपये ५ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| (d) | दुखापतीचे प्रमाण २० टक्क्यांहून कमी असल्यास | रुपये ३ लाख | रुपये ४ लाख |

टीप - जर कोणतीही महिला लैंगिक अत्याचार किंवा ॲसिड हल्ल्यामुळे पीडित झाली असेल आणि ती या योजनेच्या अनुसूचीतील एकाहून अधिक श्रेणींमध्ये समाविष्ट होत असेल, तर ती पीडिता त्या सर्व श्रेणींच्या एकत्रित भरपाई रकमेचा लाभ मिळण्यास पात्र असेल.

## नमुना - १

## लैंगिक अत्याचार व इतर गुन्ह्यांत बळी पडलेल्या/ बचावलेल्या महिलांसाठी नुकसानभरपाई योजना, २०१८ अन्वये अंतरिम किंवा अंतिम नुकसान भरपाई मिळण्याकरिता अर्ज

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदार पीडितेचे किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती/ व्यक्तिंचे नाव | |
| २. | पीडितेचे किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती/ व्यक्तिंचे वय | |
| ३. | (a) वडिलांचे नाव<br>(b) आईचे नाव<br>(c) जोडीदाराचे नाव | |
| ४. | पीडिता किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती/ व्यक्तिंचा पत्ता | |
| ५. | घटना घडल्याचा दिनांक आणि वेळ | |
| ६. | प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला आहे का? | |
| ७. | वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे का? जर असेल, तर वैद्यकीय प्रमाणपत्र/ मृत्यूचा दाखल/ पी. एम. रिपोर्ट जोडावा. | |
| ८. | प्रकरणाची सद्यस्थिती, जर प्रकरण प्रलंबित असेल तर. जर प्रकरण संपले असेल तर शिक्षा सुनावण्यात आलेल्या न्यायनिर्णय व आदेशाची प्रत जोडावी. | |
| ९. | अर्जदारास न्यायचौकशी न्यायालयाकडून किंवा इतर कोणत्याही शासकीय यंत्रणेकडून पूर्वी कोणतीही | |

| | | |
|---|---|---|
| | नुकसानभरपाई रक्कम मिळाली आहे किंवा नाही; मिळाली असल्यास त्याचा पूर्ण तपशील. | |
| १०. | झालेला आर्थिक खर्च तसेच सोसाव्या लागलेल्या आर्थिक नुकसानीचा तपशील. | |
| ११. | अर्जदाराने गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध अथवा जबाबदार व्यक्तीविरुद्ध कोणताही दिवाणी दावा किंवा नुकसानभरपाईचा अर्ज दाखल केला आहे किंवा नाही; दाखल केला असल्यास त्याचा पूर्ण तपशील.<br>पीडित स्त्रीची / तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीची सही | |

**x-x-x-x-x-x-x**